


| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ८५ वा | बुधवार, दिनांक १७ जून २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# ठाकरेंचे ६ खासदार फुटले!, लोकसभा अध्यक्षांची स्वतंत्र गटाला मंजुरी!

## ओम बिर्लांसोबत बैठकीनंतर अनिल देसाई म्हणाले– पक्षाचे विलिनीकरण होऊ शकते, गटाचे नाही; संविधानानुसार निर्णय घ्या!

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवणाऱ्या 'ऑपरेशन टायगर'ला अखेर यश आल्याचे चित्र दिसत आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन करण्यासाठी केलेल्या हालचालींना लोकसभा स्तरावर मान्यता मिळाल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन करण्यासंदर्भातील अर्ज मंगळवारीच लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे सादर केला होता.

सूत्रांच्या माहितीनुसार, लोकसभा अध्यक्षांनी या गटाला प्राथमिक मान्यता दिल्यानंतर उद्धवसेना नेतृत्वात खळबळ उडाली आहे. या घडामोडींची माहिती मिळताच खासदार संजय राऊत यांनी तातडीने संसद भवनात धाव घेत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची २० मिनिटे भेट घेतली आहे. या बैठकीत त्यांच्यासोबत खासदार अरविंद सावंत व अनिल देसाईही सोबत होते.

**उद्धवसेनेची बाजू ऐकून घ्यावी, राऊतांची मागणी**

उद्धवसेनेने यापूर्वीच लोकसभा अध्यक्षांना पत्र देत कोणत्याही फुटीर गटाला स्वतंत्र मान्यता देण्यापूर्वी पक्षाची बाजू ऐकून घेण्याची मागणी केली होती. संसदीय पक्षनेते अरविंद सावंत यांच्या स्वाक्षरीने पाठवलेल्या पत्रात, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हाच संसदेतील अधिकृत पक्ष मानला जावा आणि कोणत्याही फुटीर गटाला विशेष दर्जा किंवा मान्यता देऊ नये, अशी विनंती करण्यात आली होती. आता सहा खासदारांच्या गटाला मान्यता मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर संजय राऊत स्वतः लोकसभा अध्यक्षांकडे उद्धवसेनेची भूमिका मांडणार असल्याचे समजते.

**संजय राऊतांची दिल्लीत पत्रकार परिषद**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने मोठी पत्रकार परिषद घेऊन आपली आक्रमक भूमिका स्पष्ट केली आहे. अरविंद सावंत, अनिल देसाई, राजाभाऊ वाजे आणि संजय राऊत यांनी एकत्र येत बंडखोरीच्या चर्चांवर थेट कडक शब्दांत प्रहार केला. जर पुन्हा कोणी शिवसेना फोडण्याचा प्रयत्न केला, तर महाराष्ट्रातील जनता गप्प बसणार नाही, असा जाहीर इशारा यावेळी नेत्यांनी दिला.

**कोणी साईबाबांची, तर कोणी आई–मुलाची शपथ घेतली..**

खासदार फुटण्याच्या चर्चांवर संताप व्यक्त करताना राऊत यांनी १४ जून रोजी मातोश्रीवर झालेल्या बैठकीचा किस्सा सांगितला. राऊत म्हणाले, आमची १४ तारखेला बैठक झाली, त्याला सर्व खासदार उपस्थित होते. त्या बैठकीत एका खासदाराने ५ वेळा साईबाबांची शपथ घेतली, दुसऱ्याने आई भवानीची शपथ घेतली, तर तिसऱ्याने स्वतःच्या मुलाची आणि आईची शपथ घेतली. बाळासाहेब ठाकरेंची शपथ घेऊन सांगणारे हे खासदार जर आता बेईमानी करत असतील, तर ही डरपोकगिरी आहे आणि जनता हा तमाशा खपवून घेणार नाही.

**फुटलेले खासदार पुढे काय करणार?**

उद्धवसेनेतून फुटून बाहेर पडलेल्या सहा खासदारांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत वेगवेगळे तर्कवितर्क लढवले जात आहेत. मात्र हे फुटलेले खासदार १९ जून रोजी होणाऱ्या शिवसेनेच्या वर्धापनदिना दिवशी शिंदेसेनेत प्रवेश करणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

**फुटीर खासदारांच्या गटाला मान्यता देऊ नका, उद्धवसेनेची मागणी**

उद्धवसेनेत पडलेल्या फुटीच्या पार्श्वभूमीवर उद्धवसेनेसोबत राहिलेले खासदार अरविंद सावंत, अनिल देसाई आणि राजाभाऊ वाझे यांनी संजय राऊत यांच्यासोबत मिळून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली. यावेळी उद्धवसेनेतून फुटून बाहेर पडलेल्या खासदारांच्या गटाला वेगळा गट म्हणून मान्यता देऊ नका, अशी विनंती त्यांनी लोकसभा अध्यक्षांना केली.

**चंद्रशेखर बावनकुळे काय म्हणाले?**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून 'ऑपरेशन टायगर'अंतर्गत ठाकरेंच्या शिवसेनेचे ६ खासदार फोडण्याचे प्रयत्न सुरू असल्याच्या चर्चा आहेत. या चर्चांवर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं की, एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा निर्णय एकनाथ शिंदे घेतील आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा निर्णय उद्धव ठाकरे घेतील. मात्र, भारतीय जनता पक्षाचा या 'ऑपरेशन टायगर'शी काहीही संबंध नाही. त्यामुळे या 'ऑपरेशन टायगर'शी आमच्या नेत्यांना काही बोलणं योग्य नाही. ज्या विषयाशी संबंधित आम्हाला काहीही माहिती नाही, त्यामुळे त्याबाबत आम्हाला काही बोलणे योग्य नाही, असे स्पष्टीकरण चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.

**कोणते खासदार शिंदे गटात गेले?**

१. संजय जाधव
२. संजय देशमुख
३. नागेश पाटील आष्टीकर
४. ओमराजे निंबाळकर
५. भाऊसाहेब वाकचौरे
६. संजय दिना पाटील

## भूजल पातळीत मोठी घट

**रेणापूर/प्रतिनिधी:** बदलते हवामान, वाढते तापमान आणि घटते पर्जन्यमान यामुळे रेणापूर तालुक्यात यंदा पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता आहे. भूजल पातळीत झालेली लक्षणीय घट आणि जलसाठ्यांतील कमी झालेला पाणीसाठा लक्षात घेता पावसाचा प्रत्येक थेंब अडवून तो जमिनीत मुरविण्यासाठी 'कॅच दरेन', 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज व्यक्त होत आहे. रेणापूर तालुक्यात यंदा उन्हाळ्यात तापमानात मोठी वाढ झाली असून रेणा, व्हटी प्रकल्प तसेच रेणा नदीवरील बॅरेजमधील पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन झाले आहे. मार्च आणि एप्रिल महिन्यातच अनेक विहिरी व बोअरवेल कोरड्या पडल्याने ग्रामीण भागात पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत.

अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत असून आगामी काळात परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भूजल सर्वेक्षण यंत्रणेच्या अहवालानुसार, मागील वर्षी पाच वर्षांच्या सरासरीच्या तुलनेत तालुक्यातील भूजल पातळीत २.६१ मीटरची वाढ नोंदविण्यात आली होती. मात्र, यावर्षी ही वाढ केवळ ०.३३ मीटर इतकीच राहिली आहे. यावरून भूजल साठ्यात मोठी घट झाल्याचे स्पष्ट होत असून भविष्यात पाणीपुरवठ्यावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

## पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा लातूरमधील तक्रारदारांशी 'संवाद'

**लातूर/प्रतिनिधी:** नागरिकांच्या तक्रारी समजावून घेऊन, त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस–नागरिक यांच्यातील संवाद वाढवून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे. सदर उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना थेट पोलीस उप महानिरीक्षक यांच्यासमोर आपली व्यथा मांडण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी, पोलीस उप महानिरीक्षक हे प्रत्येक महिन्यास जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. यादरम्यान, त्या त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजावून घेऊन, त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उप महानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे. गत महिन्यात, लातूर, हिंगोली, परभणी व नांदेड या जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमाचे माध्यमातून, मोठ्या प्रमाणावर आपल्या तक्रारी पोलीस उप महानिरीक्षक यांच्यासमोर मांडल्या होत्या.

दिनांक १६ जून रोजी, पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी, पोलीस अधीक्षक, लातूर कार्यालयात जिल्हा पोलीसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतल्यानंतर, दुपारी ०३.०० ते ०६.३० या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान, एकूण (७३) तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उप महानिरीक्षक यांना सोपविले. यात, मालमत्ता विषयक वाद, हरवलेले इसम, सायबर फसवणूक, दाखल गुन्ह्यांचा तपास, अवैध व्यवसाय, इत्यादी तक्रारींचा समावेश आहे.

सदर दिवशी, प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना व निर्देश देण्यात आले आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.



याप्रसंगी, पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व लातूर शहरातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी हे हजर होते.

## पाऊस लांबल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली

**नळेगाव/अजगर मजकुरी:** मृग नक्षत्र सुरू होऊन आठवडा उलटला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांनी मशागतीची सर्व तयारी पूर्ण केली असली, तरी पावसाअभावी पेरण्या रखडल्या आहेत. त्यामुळे पाऊस आज येईल, उद्या येईल या आशेवर शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत.

जिल्ह्यातील तापमान ४० अंश सेल्सिअसच्या जवळ गेले असून माळरान तापून निखारा झाले आहे. अशा परिस्थितीतही शेतकऱ्यांनी नांगरणी, कुळवणी, शेणखत टाकणे आदी कामे पूर्ण केली आहेत. सोयाबीन, तूर, ज्वारी यांसारख्या पिकांचे बियाणेही तयार ठेवण्यात आले आहे. मात्र ऐनवेळी पावसाने हुलकावणी दिल्याने शेतकरी संभ्रमात सापडला आहे.

पावसाचे नक्षत्र लागल्यानंतरही ढग येतात आणि पाऊस न पाडताच पुढे निघून जातात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरत आहे. काही शेतकऱ्यांनी पावसाच्या आशेवर बियाणे जमिनीत टाकले असले, तरी पावसाचा खंड कायम राहिल्यास दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. वाढत्या उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर दुबार पेरणीचा खर्च परवडणारा नसल्याचे शेतकरी सांगतात.

> गेल्या वर्षी सततच्या अतिवृष्टीमुळे अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही पीक विमा मिळाला नाही. या वर्षी उन्हाळा खूप कडक झाला. अवकाळी एकही पाऊस पडला नाही. मृग नक्षत्र निघून आठ दिवस झाले तरीही पावसाचा एकही थेंब पडला नाही.पुढे उदरनिर्वाह कसा भागवायचा याची चिंता लागली आहे.
> **– शंकर पाटील,शेतकरी, नळेगाव.**

> यावर्षी पाऊस कसलाही पडला नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पुढील काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो. तापमान जास्त असल्याने पाणी पातळी खालावली आहे. वेळेवर पाऊस पडणे गरजेचे आहे.
> **– विष्णु थाडगे,शेतकरी, लिंबाळवाडी**

**पेरणी उशिरा झाल्यास उत्पादन घटण्याची भीती**

नळेगाव परीसरातील बहुतांश शेती कोरडवाहू असल्याने सिंचनाच्या सुविधा मर्यादित आहेत. मोजक्याच शेतकऱ्यांकडे विहीर, विंधन विहीर किंवा ठिबक सिंचनाची व्यवस्था आहे. मृग नक्षत्र आठ जूनपासून सुरू झाले असून अद्याप पाऊस झालेला नाही. पेरणी उशिरा झाल्यास पिकांच्या वाढीवर परिणाम होऊन उत्पादन घटण्याची भीती आहे. परिणामी शेतकऱ्यांवर आर्थिक संकट बळावणार, हे जवळपास निश्चित!

## तर्रर.. होऊन हुल्लडबाजांचा ११२ वर फेक कॉल..

**हाळी हंडरगुळी/प्रतिनिधी :** हाळी हंडरगुळी (जि. लातूर) : रविवारचा दिवस असल्याने मौज– मजा आणि पार्टी करण्यासाठी चौघे एकत्र आले. या बाबत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, मद्यप्राशन करुन तर्रर झाले आणि ११२ क्रमांक डायल करुन मारामारीची खोटी माहिती दिली. भांडण मोठे सुरू असेल, असे गृहित धरून वाढवणा पोलिस तत्काळ पोहोचले. तेव्हा वास्तविकता समजली. पोलिसांनी चौघांनाही चोप देत गुन्हाही दाखल केला आहे.उदगीर तालुक्यातील हाळी गावाजवळील एका धाब्यावर विजयानंद गोपाळ गोडे, विश्वनाथ शिवाजी गोडे, माधव संजय गोडे (तिघे रा. हाळी) आणि अंबादास गणपत बळते (रा. मुर्कीवाडी, ता. कमलनगर) हे चौघे रविवारी दारू पीत बसले होते. दारूची नशा चढल्यानंतर त्यांचा आपसात गोंधळ सुरु झाला. त्याच नशेत त्यांनी थेट पोलिसांच्या ११२ या हेल्पलाइनवर फोन केला आणि परिसरात शिविगाळ, भांडण आणि मारामारी होत असल्याची खोटी माहिती दिली. तसेच मोबाइल हरवल्याचे सांगितले.

आपत्कालीन फोनमुळे वाढवणा पोलिस ठाण्याचे पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. मात्र, तिथे पोहोचताच पोलिसांना धक्काच बसला. कारण, घटनास्थळी मारामारी तर नव्हतीच. उलट अगदी शांत वातावरण होते. पोलिसांनी बारकाईने पाहिले असता, हे चौघेही दारूच्या नशेत तर्र होऊन फोन केल्याचे समोर आले.हे पाहून पोलिसांचा पारा चढला. त्यांनी कोणतीही हयगय न करता या चौघांनाही ताब्यात घेतले आणि तिथेच 'पोलिसी खाक्या' दाखवत चांगलाच चोप दिला. याप्रकरणी पोलिस नाईक गजानन पुल्लेवाड यांच्या फिर्यादीवरून चौघांविरुद्ध वाढवणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## प्रभात किरणे

हिऱ्या मोत्याची किंमत करता येत
मैत्री आणि मित्र अनमोल असतात
हिरे मोती कधीही खरेदी करता येतात
मित्र बाजारात कधीच मिळत नसतात
–इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



खाकी वर्दी होणार
आता
अधिक हायटेक !

## चिमटा दयाचा



भेसळ करणाऱ्याची काही
आता गय नाही!
चांगल्यास भय नाही!!
चोरांच्यामनातून तुकाराम
मुंडे काही जात नाहीत!!

## केंद्रीय व नवोदय विद्यालयांमध्ये ईडब्ल्यूएस विद्यार्थ्यांना १० टक्के आरक्षण देण्याची आ. अभिमन्यू पवार यांची मागणी

### ईडब्ल्यूएस आरक्षणासाठी पाठपुरावा; देवेंद्र फडणवीसांच्या शिफारशीची केंद्रीय शिक्षणमंत्र्यांकडून दखल

**औसा/प्रतिनिधीः देशातील केंद्रीय विद्यालये आणि जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) विद्यार्थ्यांना नियमानुसार १० टक्के आरक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी या मागणीसंदर्भातील निवेदन सादर करत ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी आवश्यक धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी केली.**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील, शेतकरी कुटुंबांतील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अनेक गुणवंत विद्यार्थी केवळ आर्थिक अडचणींमुळे दर्जेदार शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहत असल्याची बाब आमदार पवार यांनी शिक्षणमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. राष्ट्रीय स्तरावर गुणवत्तापूर्ण आणि स्पर्धात्मक शिक्षण देणाऱ्या केंद्रीय विद्यालये तसेच जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये अशा विद्यार्थ्यांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.याच पार्श्वभूमीवर देशातील सर्व केंद्रीय विद्यालयांमध्ये तसेच जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये ईडब्ल्यूएस विद्यार्थ्यांसाठी १० टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केली. या निर्णयामुळे ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध होऊन सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविली जाईल, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, या विषयाबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सकारात्मक भूमिका घेत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना पत्राद्वारे विनंती केली होती. मंगळवारी झालेल्या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मागणीसंदर्भातील शिफारसपत्र केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे सादर केले.या मागणीकडे सकारात्मक दृष्टीने पाहत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संबंधित विभागाकडून प्रस्ताव मागवून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याची माहिती आमदार अभिमन्यू पवार यांनी दिली. ईडब्ल्यूएस विद्यार्थ्यांना समान संधी आणि आरक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी पुढेही सातत्याने



पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या विषयाची दखल घेत केंद्र सरकारकडे शिफारस केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तसेच मागणीचा सकारात्मक विचार केल्याबद्दल केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे आमदार अभिमन्यू पवार यांनी मनःपूर्वक आभार मानले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## युद्ध समाप्तीच्या घोषणेमुळे समाधान

अमेरिका व इराण दरम्यान युद्ध समाप्तीच्या घोषणा जाहीर झाल्याने समाधान वाटणे स्वाभाविक आहे. या युद्धामुळे जागतिक आर्थिक अशांतात निर्माण झाली आहे. इंधनाचे दर वाढले की, सर्वच दर वाढतात. ही वस्तूस्थिती आहे. भारतात तर इंधनाची मोठी झळ बसली नसली तरी दरात थोडी-फार वाढ केली गेली. स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडर दरात वाढ केली. त्याच प्रमाणे थोडाफार तुटवडा दिसून झाला. नियोजनामुळे असंतोषाचा भडका उडाला नाही तरी या युद्धामुळे असुविधा झाली हे नक्की! अमेरिका हा इराणशी थेट लढता इस्त्राईलाच्या माध्यमाद्वारे वार करीत होता. आता समझोता अमेरिका व इराण दरम्यान झाला असला तरी इस्त्राईला ते मान्य आहे का किंवा या बाबत इस्त्राईलची भुमीका स्पष्ट दिसून येत नाही. वास्तविक अमेरिका म्हणतो की, इराणशी झालेला करार मान्य आहे. मान्य असल्याबाबतचे व दुजोरा देणारे वक्तव्य इराणकडून दिसून येत नाही. अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष ट्रम्प हे कधी काय बोलतील व कोणता बदल घडवतील हे सांगता येत नाही. आज पर्यंत त्यांचा कोणताही पक्का निर्णय दिसून आला नाही. नुसते सैन्य व हवाईदलाच्या जोरावर त्यांनी आज पर्यंत दादागिरी केली आहे. वास्तविक या युद्धाची खरी झळ इस्त्राईला बसली आहे. याचे दुरगामी परिणाम इस्त्राईला भोगावे लागणार आहेत. इराण हा छोटा देश असून दिड महिण्यापासून अमेरिका अशा महासत्ताधिशांना झुंजवत आहे. आज इराणची स्थिती भयाण आहे. अमेरिकेच्या हवाई माऱ्याने शहरे, गावच्यागाव उद्धस्थ झाली आहेत. शाळा नष्ट झाल्या आहेत. लहान मुलांची दैना पाहून अनेकांना वाईट वाटते. असे असले तरी प्रत्यक्षात जगातील शांतता समिती गप्प आहेत. जागतिक झळ बसत आहे. युद्ध तातडीने थांबविले पाहिजे होते, मात्र ते दिर्घ काळ चालले, शेवटी मोठी रक्कम म्हणजे आर्थिकमदत अमेरिकेला द्यावी लागत आहे. त्यावर इराण समाधानी नाही. यापेक्षाही मोठी रक्कम मागत आहे. युद्धविरामाला दुजोरा देत नाही. त्यामुळे एकतर्फी युद्धविराम आहे की काय असे वाटायाला लागले आहे. मुळात आपल्या भारताला मोठी झळ बसली व बसत आहे. युद्धविराम झाले तर होर्मुज बेट खुले होणार का? झाले तर सर्वाधिक लाभ भारताला होणार आहे. अमेरिका हा सुरवातीपासून रशियाकडून तेल खरेदी करू नका असा ईशारा भारताला दिला होता. याला भारताने फारसे लक्ष दिले नाही. भारताने रशिया, इराण कडून तेल खरेदी चालूच ठेवली होती. तेलवाहू जहाज होर्मुजमधून आणले गेले. असे असले तरी होर्मुजमधून इंधन आणणे धोक्याचे होते. या संघर्षमय वातावरणात तीन खलाशांना जीव गमवावा लागला आहे. वास्तविक सध्याच्या स्थितीत युद्ध परवडणारे नाही. हे अमेरिकेला माहिती आहे. खुद अमेरिकन नागरिकाना हा संघर्ष मान्य नाही तरी जगावर आपली छाप पाडण्यासाठी ट्रम्प यांचा हा प्रयोग आहे. याचा भारतावर मोठा परिणाम व्हावा असे ट्रम्प यांना वाटत असले तरी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रयत्न यशस्वी ठरले आहेत. देशातील नागरिकांनी साथ दिली आहे. मुळात भारत हा अनेक बाबतीत स्वयंपर्ण नाही. केवळ कांही बाबतीत भारत हा घोषणा करतो मात्र स्वावलंबन किंवा स्वयंपुर्णता स्विकारत नाही. परावलंबि राहाणे किती धोक्याचे आहे. संकटाचे आहे हे आता कळून आले आहे. त्यामुळे इथेलान मिसळण्याची मान्यता मिळाली आहे. इंधनाला पर्याय शोधला पाहिजे. काही बाबतीत परावलंबी आहोत हे मान्यच केले पाहिजे. इतर देशात तसे नाही. स्वयंपुर्ण देश आहेत. अन्नधान्य जे आपल्यादेशात पिकले जाते तेच जाडेभरडे खाल्ले जाते. स्वदेशी मालावर मोठे प्रेम आहे. स्वदेशीवस्तू वापरावर भर दिला जातो. आपल्यादेशातील नागरिकांची मानसिकता ही आयात मालावर अधिक प्रेम करणारी आहे. ती चांगली असो किंवा वाईट परदेशिय आयात मालाची खरेदी मोठ्या प्रमाणात केली जाते. याचे उत्पन्न त्या देशातील नागरिकांना मिळते हे लक्षात घेतले पाहिजे. वास्तविक अमेरिका-ईस्त्राईल मिळून जो लढा इराणशी दिला यातून भारताने काय शिकले पाहिजे. याचा विचार केला पाहिजे. भारताने भरपूर शिकले आहे, पहिले परावलंबिनीपनाचा फटका मोठा बसतो, त्यामुळे स्वयंपुर्णता व स्वावलंबाशिवाय शक्य नाही. दुसरे असे की, सत्तरवर्षात आपण आपले उत्पादने इतरावर आवलंबुन न राहाण्यासाठी निर्माण का केली नाहीत? आपण पेट्रोल व डिझेलला पर्याय का शोधला नाही. जगात सौरऊर्जेचा वापर करून घेत असताना भारत मागे का? भारतीयांनी या युद्धावरून काही बाबी शिकल्या पाहिजेत. महासत्ताधिश अमेरिकेला सुद्धा इराण सारखा छोटा देश जेरीस आणू शकतो. नमवायाला लावू शकतो. हे यातून शिकले पाहिजे. इरणीलोकासारखी चिकटी भारतीयात असली पाहिजे. आज अमेरिकाच युद्ध विरामच्या गोष्टी बोलत आहे. नुकसान भरपाई मोठ्या प्रमाणात देत आहे. याचा अर्थ देश म्हणजे दगड-धोंडे नाहीत तर देशातील जागृत जनता आहे हे लक्षात येते. युद्धा तातडीने थांबेल असेही नाही मात्र सकारात्मक पावले पडते आहेत ही बाब समाधानाची आहे. युद्ध विराम झाले तरी काही काळ सर्व काही सुरळीत होण्यात वेळ लागणार आहे. भारतात इंधनाचे दर या युद्धामुळे वाढविले आहेत ते कमी होणार का? हा देखील संशोधनाचा विषय आहे. मुळात युद्ध आपल्यादेशापासून कोसो दूर आहे हे जरी मान्य असले तरी त्याची झळ भारतीयांना सोसावी लागत आहे हे मान्य केले पाहिजे. आता भारतीयांनी या युद्धकाळात ज्याबाबी शिकल्या आहेत. त्याचा विचार करून चालले पाहिजे. भारत हा कोणत्याही बाबतीत परावलंबी नसावा. मुळात जो पर्यंत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आहेत तो पर्यंत जागजिक शांतात नांदेल असे वाटत नाही. कधी कोणता निर्णय घेतील व काय करतील हे सांगता येत नाही. वास्तविक अमेरिकेवर जागतिक निर्बंध किंवा दबाब नाही. त्यामुळे स्वैराचाराने चालत आहे. अशा स्थितीत भारतीयांनी सतत जागृत राहून वाटचाल केली पाहिजे. युद्ध तसे पाहिले तर एक तर्फी दिसून येत आहे. अजून पक्का निर्णय दिसून येत नाही. त्यामुळे वेळीच सावध होवून भारताची वाटचाल असली पाहिजे. युद्ध समाप्तीनंतर वाढविलेल्या दराचे काय? ते कमी होणार का किंवा बाजारात वाढलेली महागाई रिव्हर्स होणार का? हे प्रश्न अधोरिखेत राहाणार का सुटणार याचा विचार आगामी काळात होवू शकतो.

# महाराणा प्रताप : राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक

**भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, सम्राट आणि योद्धे होऊन गेले. काहींनी आपल्या सामर्थ्याच्या बळावर मोठी साम्राज्ये उभी केली, तर काहींनी प्रशासन, संस्कृती आणि लोककल्याणाच्या माध्यमातून आपले वेगळेपण सिद्ध केले. परंतु केवळ पराक्रमामुळे नव्हे, तर स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा, स्वातंत्र्यप्रेम आणि अदम्य जिद्दीमुळे जनमानसात अजरामर ठरलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे महाराणा प्रताप. भारतीय संस्कृतीत मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या वीरांची परंपरा आहे. या परंपरेतील तेजस्वी नाव म्हणून महाराणा प्रताप यांचा उल्लेख केला जातो. मेवाडच्या या महान राजाने कोणत्याही प्रकारच्या परकीय अधिपत्यापुढे झुकण्यास नकार दिला आणि जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. त्यामुळेच आजही त्यांचे जीवनचरित्र प्रेरणेचा अखंड झरा मानले जाते.**



भारतातील अनेक भागांत तिथीनुसार महाराणा प्रताप यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यंदा १७ जून रोजी तिथीनुसार महाराणा प्रताप जयंती साजरी होत आहे. हा दिवस केवळ एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणाचा नसून स्वाभिमान, त्याग, राष्ट्रभक्ती आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचे पुनर्स्मरण करण्याचा आहे.

महाराणा प्रताप यांचा जन्म राजस्थानमधील कुंभलगड येथे झाला. त्यांचे वडील महाराणा उदयसिंह द्वितीय हे मेवाडचे शासक होते, तर माता जयवंता बाई यांनी प्रताप यांच्या व्यक्तिमत्त्वावर संस्कारांची समृद्ध छाप उमटविली. बालपणापासूनच प्रताप यांच्यात निर्भयता, शौर्य आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. तलवारबाजी, घोडेस्वारी, धनुर्विद्या आणि युद्धकौशल्य यांचे शिक्षण त्यांनी अत्यंत निष्ठेने घेतले. राजपुत्र म्हणून त्यांना राजवैभवाचा अनुभव मिळाला; परंतु पुढील आयुष्यात त्यांनी वनवास, दारिद्र्य आणि संघर्ष यांचाही तितक्याच धैर्याने स्वीकार केला.

सोळाव्या शतकातील भारताच्या राजकीय परिस्थितीकडे पाहिले असता मुघल साम्राज्याचा विस्तार वेगाने होत होता. सम्राट अकबराने विविध राजपूत संस्थानांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. अनेक राजपूत राजांनी मुघल अधिपत्य स्वीकारले; परंतु मेवाडचे स्वातंत्र्य टिकविण्याचा निर्धार महाराणा प्रताप यांनी केला. मेवाड हा केवळ एक प्रदेश नव्हता, तर तो राजपूत स्वाभिमानाचे प्रतीक होता. त्यामुळे मेवाडच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणे प्रताप यांना मान्य नव्हते.

इ.स. १५७२ मध्ये महाराणा प्रताप यांचा मेवाडच्या सिंहासनावर राज्याभिषेक झाला. त्या वेळी मेवाड अनेक संकटांनी वेढलेला होता. चित्तौडगड आधीच मुघलांच्या ताब्यात गेला होता. राज्याची आर्थिक स्थिती कमकुवत होती आणि अनेक भागांवर बाह्य दबाव होता. अशा कठीण परिस्थितीत प्रताप यांनी राज्यकारभाराची धुरा सांभाळली. त्यांनी आपल्या प्रजेचा विश्वास संपादन केला आणि मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी अखंड संघर्ष करण्याचा संकल्प केला.

अकबराने अनेक वेळा दूत पाठवून महाराणा प्रताप यांना मुघल अधिपत्य स्वीकारण्याचा प्रस्ताव दिला. परंतु प्रताप यांनी स्वाभिमानाशी तडजोड करण्यास स्पष्ट नकार दिला. त्यांच्यासाठी राज्यापेक्षा स्वातंत्र्य अधिक महत्त्वाचे होते. ते म्हणत असत की परकीय अधीनतेत वैभवशाली जीवन जगण्यापेक्षा स्वातंत्र्यासाठी संघर्ष करताना कष्ट सहन करणे अधिक श्रेष्ठ आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे ते भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील अग्रगण्य प्रेरणास्रोत ठरतात.

महाराणा प्रताप यांच्या जीवनातील सर्वाधिक प्रसिद्ध घटना म्हणजे हळदीघाटीची लढाई. १५७६ मध्ये मेवाड आणि मुघल सैन्य यांच्यात हळदीघाटी येथे भीषण युद्ध झाले. मुघल सैन्याचे नेतृत्व आमेरचे राजा मानसिंह करत होते, तर महाराणा प्रताप स्वतः आपल्या सैन्याचे नेतृत्व करत होते. संख्येने मुघल सैन्य अधिक बलवान असले, तरी मेवाडच्या सैनिकांनी अद्भुत शौर्याचे दर्शन घडविले. या युद्धात महाराणा प्रताप यांचा प्रिय घोडा चेतक याने दाखविलेली निष्ठा आणि पराक्रम आजही लोककथांचा विषय आहे.

चेतक हा केवळ घोडा नव्हता, तर महाराणांचा विश्वासू सहकारी होता. युद्धादरम्यान गंभीर जखमी होऊनही त्याने महाराणांना सुरक्षित स्थळी पोहोचविले. अखेरीस त्याचा मृत्यू झाला. चेतकाच्या निष्ठेची कथा भारतीय जनमानसात आजही भावनिक आदराने सांगितली जाते. महाराणा प्रताप आणि चेतक यांचे नाते हे माणूस आणि प्राणी यांच्यातील स्नेह, विश्वास आणि समर्पणाचे अद्वितीय उदाहरण मानले जाते.

हळदीघाटीच्या युद्धानंतर महाराणा प्रताप यांचे संघर्षमय जीवन अधिक कठीण बनले. त्यांनी अरवली पर्वतरांगांमध्ये आश्रय घेतला. कुटुंबासह त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला. दंतकथांनुसार त्यांच्या कुटुंबाला अनेकदा उपासमारीची वेळ आली. जंगलात राहून त्यांनी आपल्या स्वातंत्र्यलढ्याची ज्योत कायम ठेवली. संकटांनी खचून न जाता त्यांनी नव्या जोमाने सैन्य संघटित केले आणि गनिमी काव्याच्या तंत्राचा प्रभावी वापर केला.

महाराणा प्रताप यांच्या संघर्षात भामाशाह यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. भामाशाह हे महाराणांचे विश्वासू सहकारी होते. त्यांनी आपल्या संपत्तीचा मोठा भाग महाराणा प्रताप यांच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी अर्पण केला. या आर्थिक मदतीमुळे महाराणांना सैन्याची पुनर्बांधणी करता आली. राष्ट्रहितासाठी संपत्तीचा त्याग करण्याची प्रेरणा भामाशाह यांच्या उदाहरणातून मिळते.

महाराणा प्रताप हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते दूरदृष्टी असलेले प्रशासकही होते. त्यांनी आपल्या राज्यातील जनतेच्या कल्याणाला प्राधान्य दिले. प्रजेच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी विविध उपाययोजना केल्या. शेती, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न केला. जंगलांमध्ये आणि डोंगराळ भागातही प्रशासन प्रभावीपणे चालविण्याची त्यांची क्षमता उल्लेखनीय होती.

त्यांच्या राज्यकारभारातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सर्वधर्मसमभाव. महाराणा प्रताप यांनी विविध समाजघटकांना आपल्या संघर्षात सहभागी करून घेतले. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांतील लोक होते. हकीम खान सूर यांच्यासारख्या मुस्लिम योद्ध्यांनीही मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केले. यावरून महाराणा प्रताप यांची राष्ट्रकल्पना ही धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक होती, हे स्पष्ट होते.

महाराणा प्रताप यांच्या जीवनातून आत्मसन्मानाचे महत्त्व अधोरेखित होते. आजच्या भौतिकवादी युगात अनेकदा तत्त्वांशी तडजोड करण्याची प्रवृत्ती दिसून येते. अशा वेळी प्रताप यांचे जीवन आपल्याला मूल्यांशी प्रामाणिक राहण्याची प्रेरणा देते. त्यांनी संकटांना घाबरून माघार घेतली नाही. अपयश आले तरी संघर्ष सोडला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही जिद्द आणि चिकाटी आजच्या तरुण पिढीसाठी विशेष मार्गदर्शक ठरते.

इतिहासात अनेकदा युद्धांच्या निकालावरून व्यक्तिमत्त्वांचे मूल्यमापन केले जाते; परंतु महाराणा प्रताप यांच्या बाबतीत तसे घडत नाही. हळदीघाटीच्या युद्धात निर्णायक विजय मिळाला नसला, तरी त्यांनी स्वातंत्र्याचा लढा अखंड सुरू ठेवला. पुढील काळात त्यांनी मेवाडमधील अनेक प्रदेश पुन्हा आपल्या ताब्यात घेतले. चावंड येथे त्यांनी नवी राजधानी स्थापन केली आणि राज्याची पुनर्बांधणी केली. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे मूल्यमापन केवळ युद्धाच्या निकालावर नव्हे, तर त्यांच्या अटळ संघर्षावर केले पाहिजे.

महाराणा प्रताप यांच्या चरित्राचा प्रभाव साहित्य, लोककला आणि जनमानसावर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसतो. राजस्थानातील लोकगीतांमध्ये त्यांच्या शौर्याचे वर्णन आढळते. अनेक कवी, लेखक आणि इतिहासकारांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. श्यामनारायण पांडे यांच्या 'हल्दीघाटी' या काव्यातून महाराणांच्या पराक्रमाचे प्रभावी चित्रण केले गेले आहे. विविध भाषांमधील साहित्यकृतींनी त्यांच्या स्मृती जिवंत ठेवल्या आहेत.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही महाराणा प्रताप यांचे उदाहरण प्रेरणादायी मानले गेले. परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेतली. स्वराज्य, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची भावना जागृत करण्यासाठी त्यांच्या जीवनाचा उल्लेख केला जात असे. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत आदर्श व्यक्तिमत्त्वांची गरज असते आणि महाराणा प्रताप हे त्यापैकी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे.

आजच्या काळात महाराणा प्रताप जयंती साजरी करताना केवळ मिरवणुका, पुष्पहार आणि औपचारिक कार्यक्रम यांपुरते मर्यादित राहणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा समाजजीवनात अंगीकार होणे आवश्यक आहे. स्वाभिमान म्हणजे अहंकार नव्हे, तर स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होय. राष्ट्रभक्ती म्हणजे इतरांविषयी द्वेष नव्हे, तर देशाच्या प्रगतीसाठी सकारात्मक योगदान देण्याची वृत्ती होय. त्याग म्हणजे केवळ भौतिक वस्तूंचा त्याग नव्हे, तर सामूहिक हितासाठी वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवण्याची तयारी होय. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून या मूल्यांचे शिक्षण मिळते.

तरुण पिढीसमोर आज अनेक आव्हाने आहेत. स्पर्धात्मक जीवनशैली, सामाजिक माध्यमांचा प्रभाव, मूल्यांमधील बदल आणि करिअरची धडपड या सर्वांमध्ये आत्मविश्वास आणि नैतिकतेचे महत्त्व अधिक वाढले आहे. अशा परिस्थितीत महाराणा प्रताप यांचे जीवन युवकांना प्रेरणा देऊ शकते. प्रतिकूल परिस्थितीतही ध्येयाप्रती निष्ठा राखणे, परिश्रम करण्यास तयार राहणे आणि संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य बाळगणे ही शिकवण त्यांच्या चरित्रातून मिळते.

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीनेही महाराणा प्रताप यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी विविध समाजघटकांना एकत्र आणून स्वातंत्र्यलढा उभारला. आज विविधतेने नटलेल्या भारताला सामाजिक सलोखा, परस्पर आदर आणि एकात्मतेची गरज आहे. मतभेद असले तरी राष्ट्रीय हित सर्वोच्च मानण्याची वृत्ती समाजात रुजली पाहिजे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून ही प्रेरणा मिळते.

इतिहासाचा अभ्यास करताना व्यक्तिपूजेला बळी पडणे योग्य नाही; परंतु महान व्यक्तिमत्त्वांकडून प्रेरणा घेणे आवश्यक आहे. इतिहास हा केवळ भूतकाळाचा लेखाजोखा नसून वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्य घडविणारा मार्गदर्शक असतो. महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला शिकवते की परिस्थिती कितीही कठीण असली, तरी धैर्य, आत्मविश्वास आणि मूल्यनिष्ठा यांच्या बळावर संकटांवर मात करता येते.

महाराणा प्रताप यांचे निधन १५९७ मध्ये झाले. मृत्यूपूर्वीही त्यांनी मेवाडच्या स्वातंत्र्याची चिंता व्यक्त केली होती, असे सांगितले जाते. आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी मातृभूमीप्रती निष्ठा कायम ठेवली. त्यांच्या पश्चातही त्यांच्या संघर्षाची परंपरा जिवंत राहिली. आज अनेक स्मारके, पुतळे आणि ऐतिहासिक स्थळे त्यांच्या स्मृती जागवितात; परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या विचारांचे स्मरण समाजाच्या चेतनेत कायम राहणे आवश्यक आहे.

महाराणा प्रताप जयंती हा केवळ एका राजाचा जन्मदिन नाही, तर तो भारतीय स्वाभिमानाचा उत्सव आहे. या दिवशी आपण त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी पैलूंचे स्मरण करून स्वतःला अधिक जबाबदार नागरिक बनविण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, धैर्य, स्वातंत्र्यप्रेम आणि राष्ट्रसेवा ही मूल्ये आपल्या आचरणात उतरली, तरच महाराणा प्रताप यांना खरी आदरांजली वाहिली जाईल.

आज भारत प्रगतीच्या नव्या वाटेवर वाटचाल करीत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि अर्थव्यवस्था या क्षेत्रांत देशाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. तथापि, या प्रगतीला नैतिक मूल्यांची जोड असणे आवश्यक आहे. विकासासोबतच चारित्र्यनिर्मितीही महत्त्वाची आहे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून मिळणारी प्रेरणा या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. त्यांनी दाखवून दिले की भौतिक यशापेक्षा तत्त्वनिष्ठा अधिक मौल्यवान असते.

महाराणा प्रताप यांचे चरित्र हे भारतीय संस्कृतीतील तेजस्वी अध्याय आहे. त्यांचा संघर्ष, त्याग आणि स्वाभिमान यांची गाथा पिढ्यान्पिढ्या प्रेरणा देत राहील. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याचे स्मरण करून राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचा, सामाजिक ऐक्य जपण्याचा आणि मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचा निर्धार करूया. कारण इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचे स्मरण तेव्हाच सार्थ ठरते, जेव्हा त्यांच्या आदर्शांचे प्रतिबिंब आपल्या कृतीत दिसून येते.

महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, संसाधने कितीही मर्यादित असली, तरी ध्येय स्पष्ट असेल आणि त्यासाठी अखंड प्रयत्न करण्याची तयारी असेल, तर अशक्य वाटणारी उद्दिष्टेही साध्य करता येतात. स्वाभिमानाची ज्योत तेवत ठेवणारा हा महान योद्धा भारतीय जनमानसात सदैव अजरामर राहील. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करीत, तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या महाराणा प्रताप जयंतीनिमित्त सर्वांना प्रेरणा, ऊर्जा आणि राष्ट्रसेवेची नवी दिशा लाभो, हीच कृतज्ञ भावना व्यक्त करावीशी वाटते.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)* ईमेल - bagate.rajendra5gmail.com

## ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



**पुणे/प्रतिनिधी:** स्पर्धा, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी कुठेही मागे राहू नयेत, यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार, आधुनिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी मावळ तालुक्यातील पीएम श्री आदर्श केंद्र जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कान्हे येथे आयोजित 'शाळा प्रवेशोत्सव २०२६-२७' कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी आमदार सुनील शेळके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा परिषद सदस्य दिपाली हुलावळे, सुनीता येवले, शिक्षण विभागाचे उपसंचालक गणपतराव मोरे, शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर, माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड, गणेश ढोरे, विठ्ठल शिंदे, गणेश खांडगे, साहेबराव कारके यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे तसेच प्रत्येक शाळेत आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण विद्यार्थ्यांनाही शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणे समान संधी मिळणे आवश्यक आहे. यासाठी डिजिटल क्लासरूम, आधुनिक शैक्षणिक साधने आणि गुणवत्तापूर्ण पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी अभ्यासाबरोबरच क्रीडा, कला आणि कौशल्यविकासालाही प्रोत्साहन दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

## स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या सामाजिक उपक्रमांचा महाराष्ट्रातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ राज्याच्या विकासात बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी:** स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, राज्यशासन आणि खासगी क्षेत्र यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. जलसंवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने केलेले कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे. बँकेच्या विविध सामाजिक उपक्रमांच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून, जलसंधारण, आरोग्यसेवा आणि उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये; तसेच राज्यातील ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत.

### जलसुरक्षेसाठी व्यापक उपाययोजना

जलसुरक्षा उपक्रमांतर्गत १.०६ अब्ज लीटर गोड्या पाण्याची साठवण क्षमता निर्माण करण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागांमध्ये ४५ वॉटर एटीएमची स्थापना करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील गावांसह राज्यातील २७१ गावांमध्ये जलसुरक्षा मजबूत करण्यात आली आहे; तसेच आठ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना जलसंवर्धन उपाययोजना आणि हवामान-सुसंगत शेती तंत्रज्ञानासाठी मदत करण्यात आली आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्याच्या दिशेने सात लाख वृक्षांची लागवड हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

### रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना

रोजगारक्षमतेच्या क्षेत्रात ६५९८ युवकांना कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ६३ टक्के युवकांना रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक वाहने, वाहन उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, बँकिंग आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १.६६ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले आहे. या कार्यक्रमातील ६१ टक्के लाभार्थी महिला असून, ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना विशेष आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले आहे. याशिवाय ७५८ महिला सूक्ष्म उद्योजिकांनाही मदत करण्यात आली आहे.

### आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी

आरोग्य क्षेत्रात बँकेच्या 'सीईंग इज बिलिव्हिंग' या प्रमुख उपक्रमांतर्गत चार लाख ३९ हजार ६८८ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ३८ हजार ६२५ नेत्रशस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या. राज्यभरात ४९ दृष्टी केंद्रांची स्थापना करण्यात आली असून, ही केंद्रे आता स्वयंपूर्ण पद्धतीने कार्यरत आहेत. या केंद्रांमधून दरवर्षी सुमारे १.६ कोटी रुपयांचे उत्पन्न निर्माण होत आहे. जिल्हा अंधत्व नियंत्रण संस्था आणि आयुष्मान भारत यांसारख्या शासकीय योजनांशी समन्वय साधून या उपक्रमांचा विस्तार करण्यात आला आहे.

स्टँडर्ड चार्टर्ड बँक, भारतच्या शाश्वतता विभागाच्या प्रमुख करुणा भाटिया यांनी सांगितले की, वंचित आणि दुर्लक्षित समुदायांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी बँक कटिबद्ध असून, महाराष्ट्रातील जलसुरक्षा, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रातील उपक्रम ही दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीची प्रभावी उदाहरणे आहेत.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी नमूद केले की, राज्यातील लाखो नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे उपक्रम शाश्वत विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशनाला गती देणारे ठरत आहेत.

# सरकारला जनतेनी प्रश्न विचारणे गुन्हा आहे का?





Rahul Gandhi



Helle Lyng

भ्रष्ट अथवा संशयास्पद कृतीबद्दल सवाल करणार्यांचा आवाज अधिकार, संघटित ताकद याच्या जोरावर काही काळ दाबता येऊ शकेल; पण तो बंद करता येणार नाही. तो महाराष्ट्राच्या सद्सदविवेकबुद्धीचा आवाज आहे.

आज महाराष्ट्र ज्या दिशेने चालला आहे त्याबद्दल चिंता वाटावी, अशी स्थिती आहे. प्रश्न विच-ारणे हा येथे गंभीर गुन्हा ठरत आहे. 'स्टँडअप' कॉमेडीच्या नावाने अतिशय हीन अभिरूचीचे सार्वजनिक दर्शन घडविण्यात कोणाला शरम वाटत नाही. सार्वजनिक ठिकाणचे संकेत, नियम याची पर्वा नाही. ज्यांच्यावर कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी, त्या पोलिस यंत्रणेची अब्रू मुजोर आणि भ्रष्ट अधिकार्यांमुळे वेशीला टांगली गेली आहे. ठाण्यात रस्त्यावर थुंकणार्या एका कॅब चालकाला सरोश दस्तुर या ज्येष्ठ नागरिकाने जाब विचारला. निशांतधर शुक्ला हे त्या कॅबचालकाचे नाव. आपण केलेल्या चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त करणे दूर, या मुजोराने दस्तुर यांना अश्लील शिवीगाळ केली, 'इंग्रजांचे वंशज' असा उपमर्द करत त्यांना मारहाण केली. हे सर्व त्यांच्या पत्नीसमोर घडत होते आणि मदतीला एकही व्यक्ती आली नाही.

दस्तुर पदपथावर पडले. सुदैव एवढेच की, बघ्यांकडून नेहमीप्रमाणे मोबाईलवर चित्रीकरण झाल्याने कॅबचालक शुक्लाची मग्रुरी महाराष्ट्रासमोर आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेची गंभीर दखल घेत गुन्हा नोंदविण्याचा आदेश दिला नसता तर, 'प्रश्न विचारून सार्वजनिक ठिकाणी शांतता भंग केला', असा आरोप दस्तुर यांच्यावर लावण्यासही पोलिसांनी मागेपुढे पाहिले नसते! शिवसेना आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी वयोवृद्धाला मारहाण करणार्या कॅबचालकाला चोप दिला, ही दिलासा देणारी बाब.

तुम्ही घरात कसे वागता, हा तुमचा प्रश्न. मात्र; सार्वजनिक जीवनात वावरताना संकेत असतात, ही मानसिकता देशातच कमी होत आहे. चित्र भयावह आणि धिक्कार करण्यासारखे स्थानिक आणि परप्रांतीय यातील वाढत्या संघर्षाचे ते मुख्य कारण. तुम्हाला जे रीतीरिवाज योग्य वाटतात, त्याचे पालन रस्त्यांवर, अन्य सार्वजनिक ठिकाणी नको, एवढीच मराठी भाषकांची माफक अपेक्षा. महाराष्ट्रात महिला रात्री देखील निर्भयपणे फिरू शकतात, हा लौकिक पु-सून टाकण्यात कोण पुढे आहे? याचे उत्तर सर्वांना माहीत आहे.

बाहेरुन येणाऱ्या लोंढ्यांचे 'प्रतिनिधित्व' करणार्या एका तरुणाने ठाणे परिसरात अलीकडेच रस्त्यावरून चाललेल्या एका महिलेला उद्देशून गलिच्छ निर्देश केला. त्याला संबंधित महिलेने सरळ केलेच, शिवाय कार्यकर्त्यांनी चोपही दिला. दोन मुंबईंचा अनुभव गाठीशी असताना राज्यकर्ते अट्टहासाने 'तिसरी मुंबई' उभी करत आहेत. ती स्थानिकांच्या मुळावर उठणार आहे.

'तुम्ही रात्री येथे काय करत आहात?' हा वेरुळमधील एका शिक्षकाचा साधा प्रश्न त्यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरू शकतो, हे महाराष्ट्रासाठी लांछन असून ते भ्रष्ट पोलिस यंत्रणेमुळे ला-गले. याची जी चित्रफित प्रसारित झाली, त्यात एक पोलिस अधिकारी स्पष्टपणे दिसत असताना 'अनोळखी' व्यक्ती, असा उल्लेख पोलिसांकडून होतो, अन्य संशयितांविरुद्ध अशी कलमे ला-वली जातात की न्यायालयाकडून लगेच जामीन मिळतो, हे सारे चित्र भयावह आणि धिक्कार करावा, असे आहे. ते शिक्षक पाहुण्यांसाठी आइस्क्रीम आणण्याकरता बाहेर पडले होते, पण परत आला तो त्यांचा मृतदेह! इथेही विषय प्रश्न विचारण्याचा होता. सजग राहून प्रश्न विचारणे हा महाराष्ट्रात कधीपासून गुन्हा ठरू लागला? महाराष्ट्र पूर्वी असा नव्हता. जिवंत मुलीच्या हत्येच्या आरोपाखाली तिच्या वडिलांना आणि भाव-ाला तुरुंगात डांबण्याचा लज्जास्पद गुन्हा महाराष्ट्र पोलिसांनी अलीकडेच केला. जळगाव जामोद परिसरातील त्या घटनेत कोणतीही खातरजमा न करता, जो मृतदेह सापडला त्याची डीएनए चाचणी न करताच पोलिसांनी निष्पाप बाप-लेकाला तुरुंगात डांबले. एकीकडे मस्तवालपणा आणि मग्रुरीचे दर्शन आणि दुसरीकडे 'स्टँडअप' कॉमेडीच्या नावाने विकृतीला व्यासपीठ. मृतदेहाच्या अवयवाबद्दल महिला डॉक्टर शेरेबाजी करते, दुसरा सहभागी युवक महिलेला ३७० रुपयांची बिर्याणी खाऊ घालून कोणती अपेक्षा ठेवतो, हे समोर आले आणि सुजाण नागरिकांची मान शरमेने झुकली. या सर्वांच्या जागा तुरुंगात आहेत; पण आज तिथे निष्पाप व्यक्तींनाच अडकवण्यात खाकी वर्दीला भूषण वाटत आहे.

# सुसंगत जीवनात अतिशय महत्त्वाची

**अध्यात्म – ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज**

आयुष्यात संगतीला फार महत्त्व असते. संगतीचा परिणाम विनासायास आणि बराचसा न कळत होत असतो. संतसंगती लाभणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. ती पूर्वपुण्याईमुळेच लाभते. ज्याच्याशी आपण संगत करावी, त्याचे गुणधर्म आपल्याला येऊन चिकटतात हे आपण पाहतो. समजा, काही लोकांनी इथे यायचे ठरविले. एकाने विचार केला की आपण पायीच जाऊ, दुसरा बैलगाडीने निघाला, तिसऱ्याने आगगाडीने प्रवास केला, तर चौथा मोटारने आला. सर्वजण जर एकाच ठिकाणाहून निघाले तर साहजिकच मोटारीने येणारा सर्वात लवकर पोहोचेल; म्हणजे ज्याच्याशी संगत केली त्या वाहनाचे गुणधर्म त्याला विनासायास लाभले. संगतीची दुसरी गंमत अशी की, ज्याच्या संगतीत आपण जातो त्याच्यापुढे आपले कर्तृत्व लोप पावते. इथून पुष्कळ मुले शिक्षण घेऊन पुढे कुणी वकील झाले, तर कुणी डॉक्टर झाले. परत इथे आल्यावर त्यांनी इथल्या मुलींशी लग्ने केली. त्या मुली फारशा शिकलेल्या नसतील; परंतु वकिलाशी लग्न केलेली वकिलीणबाई झाली, डॉक्टरशी लग्न केलेली डॉक्टरीण झाली. असे जर देहाच्या संगतीने सामान्य माणसाचेही गुणधर्म आपल्यात येतात, तर सत्संगतीचा परिणाम किती होत असला पाहिजे !आपण तिकीट काढून गाडीत बसतो. आपल्या शेजारी कोण येऊन बसेल ते आपल्या हाती नसते. तो विडी ओढणारा असला आणि आपल्याला धूर सहन होत नसला तरी नाइलाजाने तिथेच बसावे लागते. व्यसनी किंवा विषयी माणसाची संगत ही अशी तापदायक, घातक असते. उलट सत्पुरुषाची संगत ही उत्तम, लाभदायी ठरते. सत्संगतीपासून सद्वासना आणि सद्विचार प्राप्त होतात.एखादा साधू बैरागी असेल, झाडाखाली बसला असेल. तो स्वत: उपाशी असेल तर त्याच्याकडे येणारी मंडळीही उपाशी राहतील. समर्थांकडे कुणी गेला तर ते म्हणतील, मी भिक्षेची झोळी घेतो, तूही घे; दोघेही भिक्षा मागून आणू आणि जे मिळेल ते शिजवून खाऊ. पण संत गृहस्थाश्रमी असेल तर आपल्याकडे येणाऱ्याला तो वाटेल ते करून खायला घालील. अन्नानुसार वासना बनते, म्हणून संताघरचे अन्न मागून घेऊन खावे. संताची देहाने संगती लाभणे सुलभ नाही. तो राहत असेल तिथून आपण लांब राहत असू आणि जवळ राहत असलो तरी प्रपंच-कामधंद्यामुळे चोवीस तासांत त्याच्या सान्निध्यात कितीसे राहता येणार? मग देहसंगतीचा लाभ कितीसा मिळेल? तेव्हा नामाची संगत हीच सर्वांना सदासर्वकाळ लाभण्यासारखी उत्तम सत्संगत होय.तात्पर्य : परमार्थ साधण्यास सत्संगती फारच उपयोगी पडते.

## ताडासणाचे फायदे



आजकालच्या धावपळीच्या जीवनात बहुतेक लोक आरोग्याकडे लक्ष देऊ शकत नाही. यामुळे सांधे, स्लिप डिस्क आणि पाठदुखी यासारख्या समस्या निर्माण होतात. हे आजार कमी करण्यासाठी मकरासन योग खूप उपयुक्त आहे.मकरासन पोटावर झोपून केले जाते. हा योग करणे खुप सोपे आहे. नियमितपणे सकाळी मकारासन केल्यास अनेक आजार दूर राहतात. तसेच शरीर आणि मन पूर्णपणे शांत राहते. मकरासन करण्याची योग्य पद्धत आणि फायदे जाणून घेऊया.मकरासन करायची योग्य पद्धत कोणती मकरासन करताना सर्वात आधी पोटावर झोपावे. दोन्ही हात कोपरात वाकवून हनुवटी दोन्ही हातांच्या मध्यभागाच्या खोलग्यात घ्यावी. दोन्ही हाताचे कोपरे जमिनीवर टेकवत एकमेकांना चिकटून घ्यावी. श्वास आत ओढून पाय क्रमश: प्रथम एक एक व नंतर दोन्ही गिडघ्यांना दुमडावे व पायाच्या टाचा नितंबाला लावाव्यात. श्वास सोडत पाय खाली सरळ करावेत. दुसरी पद्धत-मकरासन करताना सर्वात आधी पोटावर झोपावे. दोन्ही हात कोपरात वाकवून दोन्ही तळहात एकमेकांवर ठेऊन तळहात जमिनीवर ठेवा.नंतर त्यावर कपाळ टेकवून विश्रांती घ्यावी.

कालावधी-सुरूवातीला ५ वेळा आणि नंतर वाढवित १०- १५- २० मिनिटांपर्यंत करावे.

मकरासन करण्याचे फायदे-उच्च रक्तदाब उच्च रक्तदाबाची समस्या असल्यास हा योग करावा. मानसिक ताण मकरासन केल्याने मानसिक ताण कमी होण्यास मदत मिळते. निद्रानाश निद्रानाशाची समस्या असलेल्या लोकांनी मकरासन करावे. यामुळे शांत झोप लागते.

नैराश्य-करासन केल्याने नैराश्य कमी होते.

पाठदुखी-मकरासन केल्याने पाठदुखीची समस्या कमी होते.वजन नियंत्रणात राहते-मकरासन केल्याने वजन नियंत्रणात राहते.मकरासन करताना कोणती काळजी घ्यावी ?कंबर, पाठ आणि मानेमध्ये खूप दुखत असेल तर हा योग करू नका. शरीराच्या कोणत्याही भागाला दुखापत झाल्यास करणे टाळावे.तुम्हाला आरोग्याशी संबंधित इतर कोणतीही समस्या असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतर हा योग करावा.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



हेल्थ टिप्स-आपण समोर पदार्थ दिसला की खातो. भूक लागलेली नसतानाही खाल्ल्याने आपण अनेक आजारांना आमंत्रण देत असल्याचं त्यांनी कट्टयावर सांगितलं. मात्र दिवसातून फक्त दोनवेळा जेवण घेतल्याने या अनेक आजारांना आळा बसण्यास मदत होते असंही त्यांनी म्हटलं आहे.आहारामध्ये साखर, मध, गूळ यांचं प्रमाण जेवढं कमी ठेवाल तितकाच आरोग्याला फायदा होईल. शाकाहारी लोकांनी आहारात प्रथिनं म्हणजेच प्रोटिन्सचा आह-ारात जास्तीत जास्त समावेश केला पाहिजे.

## २ Joke विनोद




शाळा तपासनीस नारायण नावाच्या मुलाला विचारतात, ङ्गबाळा काय तुझं नाव ?फ
तो उत्तरतो, ङ्गनारूफ
त्यावर ते म्हणतात, ङ्गबाळा नारायण म्हणावे.फ
हाच प्रश्न राम नावाच्या मुलाला विचारल्यावर तो लगेच उत्तर देतो,

## ३ Message संदेश




Teacher- Bataao bachcho jo galat kaam karte hain wo kaha jate hain??
Student- sharmate huye bola sir.. Manuabhaan tekri, EKAANT park, Chinar park, MAYUR park...

## ४ Thought सुविचार



दु:खातसुद्धा एक फार चांगली गोष्ट आहे. दु:ख फार लांबले तर त्यात तीव्रता रहात नाही व दु:ख जर तीव्र असेल तर ते लांबत नाही.

– अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

**सर्वमेव परित्यज्य शरीरमनुपालयेत्**
**शरीरस्य प्रणष्टस्य सर्वमेव विनश्यति**

अर्थ:-सर्व गोष्टींचा त्याग करावा लागला तरीही प्रथम शरीराचे नियम पाळायला हवेत. कारण शरीराचा नाश झाला तर सर्वस्वच नष्ट होते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. नमस्काराचा एकल शब्द
५. अत्यंत कृश माणूस
९. अपशकुन
१०. धाक
११. धनको
१२. कोलकाताचे विमानतळ
१३. दटावणी, धमकावणे
१५. चमक, मुरगळा
१७. राष्ट्र
१८. कलंक, बट्टा
२०. अशिलाची बाजू मांडणारा
२१. शर्यतीत धावणारे गोष्टीतील दोन प्राणी
२३. प्रचंड
२६. श्रेष्ठ पुरुष
२८. कणीदार
२९. कुंतीचे पुत्र
३०. दूर करणारा
३२. दुर्दशा
३३. बगीचा
३४. निकट, जवळ
३६. चांदी
३७. 'तर'च्या बरोबरच्या शब्द
३८. माणूस
३९. पुष्कळ
४०. च्या साठी
४२. जन्माचे प्रमाणपत्र
४३. बिनवासाचे पांढरे फूल
४४. डुक्कर
४६. सामान
४८. जात, जातीतील पोटभाग
५०. समशेर
५३. शिंपला, एक छोटी समुद्री प्राणी
५४. प्रश्न
५७. उत्तराधिकारी
५८. मदतनीस
५९. एक मंगल वाद्य
६१. गाव, नगर
६५. मगज
६७. माणूस
६९. ताप येण्यापूर्वीचे शहारे
७०. संगीतातील ठेका
७१. भटक्या गोसावी
७४. धर्मार्थ देणे
७५. अधाशी
७६. च्या देखत, समक्ष
७७. पालखी, मेणा
७८. पदार्थाचा सूक्ष्म भाग

### उभे शब्द

१. राजमहाल
२. करपलेले पीक
३. जाणे-येणे, वहिवाट
४. युद्ध
५. गावप्रमुखाचे कार्य
६. महाराणा प्रतापचा घोड्याचे नाव
७. तात्काळ, ताबडतोब
८. दारूचा एक प्रकार
९. पंजाबातही प्रसिद्ध मराठी संत
११. औषध
१४. मुले-बाळे असलेला
१६. हालचाल
१९. हत्ती
२१. सूट, वाढीव मुदत
२२. स्त्रियांचा पंजाबी पोशाख
२४. भरभराट
२५. सैन्याचा विभाग
२७. चुका करत करत
२९. उपकार
३१. मातीचा कण
३२. अवाजवी
३३. पोते
३५. तृण
३७. जनन
३८. रेलचेल, विपुलता
३९. वनवास
४१. वर-वधूची मिरवणूक
४५. मिठाई तयार करणारा
४७. श्रीरामाची जुळे मुले
४९. नशा आणणारा, कैफी
५१. घाव, प्रहार
५२. जिव्हा
५३. कारखान्याचा मालक
५५. बारीक सारीक
५६. गुजराथी नृत्यप्रकार
६०. मऊ
६२. शिव! शिव!
६३. आवड, रुची
६४. सैन्याची तुकडी
६६. चांदणी
६८. अरण्य
७०. तारणारा
७२. धातुचा धागा
७३. चामखीळ

### आडवे उत्तर

१.रामराम ५.पाप्याचे पितर ९.नाट
१०.जरब ११.दमदाटी १२.डमडम
१३.तालेवार १५.लचक १७.देश
१८.डाग २०.वकील २१.ससा कासव
२३.जबरदस्त २६.नरवर २८.रवाळ
२९.पांडव ३०.निवारक ३२.अवकळा
३३.बाग ३४.लगत ३६.रजत ३७.जर
३८.मानव ३९.अनेक ४०.स्तव
४२.जन्मदाखला ४३.तगर
४४.वराह ४६.माल ४८.जमात
५०.तलवार ५३.कालव ५४.सवाल
५७.वारसदार ५८.सहाय्यक ५९.सनई
६१.शहर ६५.गर ६७.मानव ६९.रसकस
७०.ताल ७१.रमताराम ७४.दान
७५.हावरट ७६.समोर ७७.नरवाहन
७८.कण

### उभे उत्तर

१.राजवाडा २.मर ३.राबता
४.समर ५.पाटीलकी ६.चेतक
७.तडकसार ८.रम ९.नामदेव
११.दवा १४.लेकुरवाळा
१६.चलनवलन १९.गज २१.सवलत
२२.सलवार कमीज २४.बरकत
२५.दळ २७.चुकतमाकत २९.पांग
३१.रज ३२.अवास्तव ३३.बारदान
३५.गवत ३७.जन्म ३८.मालामाल
३९.अरण्यवास ४१.वरात
४५.हलवाई ४७.लवकुश
४९.मादक ५१.वार ५२.रसना
५३.कारखानदार ५५.लहानसहान
५६.रासगरबा ६०.नरम ६२.हरहर
६३.रस ६४.पलटण ६६.तारा
६८.वन ७०.तारक ७२.तार ७३.मस



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### फूटबॉल वर्ल्डकप २०२६ मध्ये भारतीय वंशाच्या खेळाडूची चर्चा! कोण आहे सरप्रीत सिंग?

नवी दिल्ली-इराण विरुद्ध न्यूझीलंड यांच्यामध्ये सामना पार पडला या सामन्यात २-२ अशा बरोबरीत हा सामना पार पडला. भारतीय फुटबॉल चाहत्यांची इच्छा आहे की टीम इंडियाने फुटबॉल वर्ल्डकपमध्ये पात्रता मिळवावी. भारताचा फुटबॉल संघ हा फ ुटबॉल चॅम्पियनशिपसाठी पात्र ठरला नाही पण भारतीय वंशाच्या खेळाडूंचा सहभाग दोन दिवसापूर्वी ऑस्ट्रेलियाच्या संघामध्ये पाहायला मिळाला. आता काल न्यूझीलंड विरुद्ध इराण यांच्यामध्ये सामना झाला या सामन्यामध्ये भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी आनंद म्हणजेच भारतीय वंशाचा खेळाडूने पहिल्यांदा फुटबॉल चॅम्पियनशिप २०२६ मध्ये प्लेइंग ११ मध्ये पदार्पण केले. कोण आहे २७ वर्षीय सरप्रीत सिंग याबद्दल सविस्तर जाणून घ्या.

फुटबॉल वर्ल्डकप २०२६ मध्ये न्यूझीलंडच्या संघाने वर्ल्ड कपच्या मोहिमेला सुरुवात केली. या न्यूझीलंडच्या संघामध्ये भारतीय वंशाच्या खेळाडू सरप्रीत सिंगने फुटबॉल विश्वचषकात पदार्पण केले, या सामन्यात तो प्लेइंग ११ चा देखील भाग होता. सरप्रीत सिंग याचे पदार्पण हे भारतीयांच्या आठवणीत राहणारे असेल. न्यूझीलंडचे मुख्य प्रशिक्षक डॅरेन बेझले यांनी त्याला सामील केले होते, या इराणविरुद्ध सामन्यामध्ये सरप्रीत सिंग हा जवळजवळ संपूर्ण सामना खेळला, ९० व्या मि निटाला त्याच्या जागी बदली खेळाडूने त्याची निवड करण्यात आली. सरप्रीत सिंग याने १० क्रमांकाची जर्सी घातली होती.

### मुंबई क्रिकेटचा स्टार, चिन्मय सुतार; बॅक-टू-बॅक विजेतेपद-ात बजावली मोलाची भूमिका

मुंबई-मुंबई टी२० लीगचा चौथा सीझन नुकताच दिमाखात पार पडला. अंतिम सामन्यात ममुंबई साऊथ सेंट्रल मराठा रॉयल्सफसंघाने आर्क्स अंधेरी संघाचा ८ धावांनी पराभव करत सलग दुसऱ्यांदा जेतेपदाचा चषक उंचावला. मराठा रॉयल्सच्या या ऐतिहासिक यशात मधल्या फळी-तील भरवशाचा फलंदाज चिन्मय सुतार याने अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. सेमी फायनल आणि फायनलमधील त्याच्या झुंजार अर्धशतकी खेळीच्या जोरावर मराठा रॉयल्सने पुन्हा एकदा मैदानावर वर्चस्व गाजवले.

यंदाच्या सीझनची आकडेवारी

चिन्मयने गेल्या वर्षीचा आपला उत्कृष्ट फॉर्म यंदाही कायम राखला. संपूर्ण स्पर्धेत त्याने मराठा रॉयल्ससाठी संकटमोचकाची भूमिका बजावली:

एकूण सामने : ७, एकूण धावा : २१२ (२ अर्धशतके), सरासरी : ४२.४०

स्ट्राईक रेट : १२० च्या आसपास फायनल सामन्यात आर्क्स अंधेरीविरुद्ध सुरुवातीला २ विकेट्स लवकर गेल्यावर चिन्मयने कर्णधार सिद्धेश लाडसोबत ६५ धावांची महत्त्वपूर्ण भागीद-ारी रचली. चिन्मयने ५२ चेंडूत ६१ धावांची संयमी आणि खेळी करत संघाला १५४ धावांच्या आव्हानात्मक धावसंख्येपर्यंत पोहोचवले. बाद फ ेरीतील निर्णायक कामगिरीचिन्मय सुतारने केवळ फायनलमध्येच नाही, तर सेमी फायनलमध्येही संघाला एकहाती विजय मिळवून दिला होता. नॉर्थ मुंबई पँथर्सविरुद्धच्या उपांत्य सामन्यात सुरुवातीला अवघ्या ५ धावांत २ विकेट्स पडल्या असताना त्याने ४९ चेंडूत नाबाद ६२ धावांची मॅचविनिंग खेळी खेळली होती.

### मला चेंडूही दिसत नाहीये तिलक वर्मा यांच्या हट्टामुळे खेळवली गेली मसुपर ओव्हर; पंचांना घ्यावी लागली माघार

दिल्ली-भारत मअफसंघ सध्या तिलक वर्मा यांच्या नेतृत्वाखाली श्रीलंकेच्या दौऱ्यावर असून तिरंगी मअफमालिकेत सहभागी होत आहे. हा सामना अत्यंत चुरशीचा झाला, मात्र त्यात अनेक वादही निर्माण झाले. सामन्यादरम्यान भारत मअफ्चा कर्णधार तिलक वर्मा यांचे पंचांशी अनेकदा खटके उडाले, तर वैभव सूर्यवंशी याची एका श्रीलंकन खेळाडूशी धक्काबुक्की झाली.प्रथम फलंदाजी करताना भारत मअफसंघाने २६५ धावा केल्या. विजयासाठी श्रीलंका संघाला शेवटच्या चेंडूवर दोन धावांची गरज होती, परंतु त्यांना केवळ एकच धाव काढता आली आणि सामना बरोबरीत सुटला. प्रकाश कमी झाल्यामुळे मैदानावर उपस्थित पंच मसुपर ओव्हरफखेळवण्यास तयार नव्हते, परंतु कर्णधार तिलक वर्मा यांच्या नेतृत्वाखाली भारतीय खेळाडूंनी त्यांना घेराव घातला. मस्टार स्पोर्ट्सफ्च्या वृत्तानुसार, पंचांना खेळण्यासाठी परिस्थिती अयोग्य वाटल्यास सामना थांबवला जाईल, असे संकेत सामना अधिकाऱ्यांनी दिले होते. असे समजते की, भारत मअफ्चा कर्णधार तिलक वर्मा यांनी मसुपर ओव्हरफखेळवण्याबाबत ठाम भूमिका घेतली होती. वेगवान गोलंदाजांना गोलंदाजी करण्याची परव-ानगी दीर्घ चर्चेनंतर, प्रकाशाची स्थिती अधिक खालावलेली असतानाही पंच अखेरीस मसुपर ओव्हरफ्साठी सहमत झाले. मसुपर ओव्हरफ्मध्ये वेगवान गोलंदाजांना गोलंदाजी करण्याची परव-ानगी दिल्याने वादात अधिकच भर पडली.

# स्वीडनचा ट्युनिशियावर ५-१ ने दणदणीत विजय

मेक्सिको : यासर अयारीच्या दोन गोलच्या जोरावर स्वीडनने ट्युनिशियाचा ५-१ असा पराभव केला. या विजयामुळे स्वीडन 'ग्रुप एफ'मध्ये अव्वल स्थानी पोहोचले आहे.यासर अयारीने सामन्याच्या ७ व्या मिनिटाला गोल केला, जो स्पर्धेच्या इतिहासातील दुसरा सर्वात वेगवान गोल ठरला. मध्यंतरापूर्वी २-१ ने आघाडीवर असलेल्या स्वीडनने दुसर्या हाफमध्ये तीन गोल केले.

जपान-नेदरलँड्स सामना बरोबरीत विश्वचषक 'ग्रुप एफ'च्या सामन्यात जपानने शेवटच्या क्षणी गोल करून नेदरलँडला २-२ अशा बरोबरीत रोखले. अर्लिंग्टनमधील एटी अँड टी स्टेडियमवर ८८व्या मिनिटाला दाइची कामाडाच्या हेडरने जपानला एक महत्त्वाचा गुण मिळवून दिला.पहिल्या सत्रात दोन्ही संघाला गोल करता आले नाही, पण दुसर्या हाफमध्ये सामन्याचे चित्रच पालटले. दोन्ही संघांनी १४ मिनिटांत तीन-तीन गोल करून सामना रोमांचक बनवला. नेदरलँडने ५०व्या मिनिटाला आघाडी घेतली. कर्णधार व्हर्जिल व्हॅन डाइकने बॉक्सच्या आतून हेडरद्वारे गोल करून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. मात्र, अवघ्या सात मिनिटांनंतर जपानने बरोबरी साधली.जपानच्या प्रेक्षकांनी मने जिंकली जपानच्या फुटबॉल चाहत्यांनी आपल्या आगळ्यावेगळ्या कृतीने सर्वांच मने जिंकली. नेदरलँड विरुद्धचा सामना संपल्यानंतर जपानी चाहत्यांनी स्टेडियममध्ये थांबून तेथील सर्व कचरा साफ केला. यामध्ये अगदी थोर्यामोठ्यांपासून ते लहान मुलांपर्यंत सर्वांनी हातभार लावला. यातून जपानी संस्कृतीतील आदर आणि शिस्तीचे पुन्हा एकदा चित्र दिसून आले.

विश्वचषक फुटबॉल स्पर्धा - जर्मनीचा मोठा विजयटेक्सास : चार वेळा विश्वविजेत्या जर्मनीने आपल्या विश्वचषक मोहिमेची शानदार सुरुवात केली. या संघाने रविवारी रात्री कुराकाओचा ७-१ असा पराभव केला. गट 'इ' मधील या सामन्यात जर्मनीने सहाव्या मिनिटाला गोल करून खाते उघडले. विश्वचषकात प्रथमच सहभागी झालेल्या कुराकाओनेही स्पर्धेच्या इतिहासातील आपला पहिला गोल नोंदवला. जर्मनीने दुसर्या हाफमध्ये सहा गोल करून सामन्याला एकतर्फी बनवले. ह्यूस्टन स्टेडियमवर जर्मनीच्या काय हावर्ट्झने दोन गोल केले, तर इतर सहा खेळाडूंनीही गोल नोंदवले. जर्मनीचा पुढील सामना आयव्हरी कोस्टशी होईल, तर कुराकाओचा सामना इक्वेडोरशी होईल.







वैभवचा श्रीलंकेच्या खेळाडूंसोबत वाद

# सुपर ओव्हरमध्ये श्रीलंका 'अ' संघाचा भारत 'अ' संघावर विजय

दांबुला : दांबुला येथे खेळल्या गेलेल्या तिरंगी मालिकेतील रोमांचक सुपर ओव्हरमध्ये श्रीलंका 'अ' संघाने भारत 'अ' संघाचा सोमवारी पराभव केला. सामन्यानंतर, वैभव सूर्यवंशीचा एका श्रीलंकन खेळाडूशी वाद झाला. त्याने त्याला ढकलले. मात्र, त्याचा सहकारी फलंदाज सूर्यांश शेडगेने परिस्थिती शांत केली.यापूर्वी, प्रथम फलंदाजी करताना भारत 'अ' संघाने ४९.२ षटकांत २६५ धावा केल्या. प्रत्युत्तरात, श्रीलंका 'अ' संघानेही ५० षटकांत २६५ धावा केल्या. श्रीलंकेला विजयासाठी शेवटच्या चेंडूवर २ धावांची गरज होती, पण त्यांना केवळ १ धावच करता आली. जेव्हा सामना बरोबरीत सुटला, तेव्हा सुपर ओव्हर होईल की नाही हे अस्पष्ट होते; पण भारतीय कर्णधार तिलक वर्मा पंचांशी वाद घालू लागला. त्यानंतर सुपर ओव्हर घेण्याचा निर्णय घेण्यात आला.पुढचा वाद सुपर ओव्हरमध्ये श्रीलंकेच्या डावाच्या शेवटच्या चेंडूवर निर्माण झाला. अर्शद खानच्या फुल-टॉसवर एक श्रीलंकन फलंदाजाला झेलबाद केले. पंचांनीही त्याला बाद घोषित केले. त्यानंतर भारतीय खेळाडूमैदान सोडून गेले. नंतर पुन्हा पाहिल्यास पंचांना असे दिसून आले की, तो चेंडू फलंदाजाच्या कमरेच्यावर असल्याने तो नो-बॉल होता. भारतीय खेळाडूंना परत बोलावण्यात आले आणि शेवटचा चेंडू पुन्हा टाकण्यात आला.भारत सामना हरल्यानंतर, श्रीलंकन खेळाडूंनी वैभवशी संवाद साधला, यात वैभवला राग आला आणि त्याने एका श्रीलंकन खेळाडूशी झटापट केली.

कधी, कुठे, केव्हा होणार लढत; वेळ नोट करून ठेवा

# आता टीम इंडिया एकाच दिवशी खेळणार तीन सामने!




दिल्ली-भारतीय क्रिकेट संघ यंदा एकाचवेळी विविध दौऱ्यांवर आहे. भारताचा वरिष्ठ पुरूष संघ घरच्या मैदानावर अफगाणिस्तानविरूद्ध वनडे मालिका खेळत आहे, तर भारत अ संघ श्रीलंका अफगाणिस्तानविरूद्ध तिरंगी मालिका श्रीलंकेत खेळत आहे. याशिवाय भारताला महिला वरिष्ठ संघ टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेसाठी इंग्लंडमध्ये आहे. हे तिन्ही संघ उद्या म्हणजेच १७ जून रोजी सामने खेळणार आहे, हे सामने कधी कुठे आणि किती वाजता होणार हे जाणून घेऊया.

बुधवार, १७ जून रोजी भारतीय संघाचे ३ सामने होणार आहेत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत क्रिकेटचा भरपूर थरार अनुभवता येईल. त्यामुळे, सर्व सामन्यांच्या वेळा नक्कीच नोंदवून ठेवा, जेणेकरून कोणताही सामना पाहण्यापासून हुकणार नाही. शिवाय हे सर्व सामने कुठे पाहता येणार, हेदेखील जाणून घेऊया.

भारत अ संघाचा तिरंगी मालिकेतील सामना किती वाजता?तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील भारत अ संघ सध्या तिरंगी मालिकेसाठी श्रीलंकेत आहे. या मालिकेतील भारताचा अखेरचा साखळी साम ना बुधवारी अफगाणिस्तानविरुद्ध होणार आहे. भारतीय संघाने आपल्या पहिल्या सामन्यात श्रीलंकेचा पराभव केला होता, परंतु त्यानंतर दुसऱ्या सामन्यात त्यांना अफगाणिस्तानकडून पराभव पत्करावा लागला. तिसऱ्या सामन्यात भारताचा पुन्हा एकदा श्रीलंकेशी सामना झाला; ५० षटकांचा हा सामना बरोबरीत सुटला, मात्र त्यानंतर झालेल्या 'सुपर ओव्हर'मध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला.

आता, जर संघाला या तिरंगी मालिकेतील अंतिम सामन्यात खेळायचं असेल, तर त्यांना अफगाणिस्तानचा पराभव करावा लागेल. हा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी १०:०० वाजता सुरू होईल. हा ५० षटकांचा एकदिवसीय सामना असल्याने, तो संध्याकाळी ६:०० च्या सुमारास संपण्याची शक्यता आहे. हा सामना सोनी लिव्ह ॲप आणि टीव्ही चॅनेलवर लाईव्ह पाहता येणार आहे.

भारत-अफगाणिस्तान दुसरा वनडे सामना किती वाजता सुरू होणार?

भारत आणि अफगाणिस्तान वरिष्ठ संघांमध्ये वनडे मालिकेतील दुसरा सामना खेळ-वला जाणार आहे. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात सध्या तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे; पहिल्या सामन्यात भारतीय संघाने सहज विजय मिळवला. दुसरा सामना १७ जूनला दुपारी १.३० वाजता सुरू होणार आहे. शिवाय हा सामना जिओ हॉटस्टार ॲप आणि स्टार स्पोर्ट्स या चॅनेलवर लाईव्ह पाहता येईल.

भारत महिला संघाचा नेदरलँड्सविरूद्ध टी-२० वर्ल्डकप सामना कधी होणार?

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघ खेळत आहे. पहिल्याच सामन्यात पाकिस्तानचा धुव्वा उडवत भारताने विजयाने स्पर्धेला सुरूवात केली. आता भारताचा गट टप्प्यातील दुसरा सामना नेदरलँड्स संघाविरूद्ध होणार असून हा सामना संध्याकाळी ७ वाजता खेळवला जाईल.

## मैदानावर गोल, नंतर बंदुकीचा इशारा

इराण-फिफा विश्वचषक २०२६ सुरू आहे आणि याच दरम्यान अमेरिका आणि इराण यांच्यामध्ये सध्या तणावपूर्ण वातावरण आहे. अमेरिकेत फिफा विश्वचषक २०२६ आयोजन करण्यात आले आहे आणि काल इराण फुटबॉल संघाचा पहिला सामना हा न्यूझीलंडविरुद्ध पार पडला. न्यूझीलंड विरुद्ध इराण यांच्यामध्ये झालेल्या सामन्यात २-२ असा सामना बरोबरीत संपला. सोम वारी रात्री न्युझीलँड विरुद्ध झालेल्या सामन्यात एका खेळाडूचे सेलिब्रेशन सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रम ाणात चर्चेत आहे. गट जी मधील गोल केल्यानंतर इराणच्या खेळाडूने बंदुकीचे सेलिब्रेशन केले आणि आताच ते वादाचे कारण ठरले आहे.

# भारतीय वंशाच्या खेळाडूंचा दबदबा

मुंबई-फुटबॉल विश्वचषकाचा महाकुंभ सध्या जगभरात सुरू आहे. युरोप आणि आफ्रिकेतील संघांची धडाकेबाज कामगिरी पाहून प्रत्येक भारतीय चाहत्याच्या मनात एकच प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे ''भारतीय फुटबॉल संघ जागतिक मंचावर कधी झळकणार?'' मात्र, याच विश्वचषकात घडलेल्या एका घटनेने भारतीय फुटबॉल प्रेमींना सुखद धक्का दिला असून भारतीय वंशाच्या खेळाडूंच्या कामगिरीची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. ऑस्ट्रेलिया आणि टर्की यांच्यातील अटीतटीच्या सामन्यात ६० व्या मिनिटाला जेव्हा ऑस्ट्रेलियाने 'निशान वेलूपिल्लई'ला मैदानावर उतरवले, तेव्हा एक नवा इतिहास घडला. गेले २० वर्षे भारतीय फुटबॉल चाहते अशा एका क्षणाची वाट पाहत होते. निशान वेलूपिल्लईचे वडील तमिळ-श्रीलंकन असून आई अँग्लो-इंडियन आहे. पिवळ्या-हिरव्या ऑसी जर्सीमध्ये मैदानात उतरलेला हा खेळाडू आज जागतिक स्तरावर भारतीय प्रतिभेचा अभिमानास्पद चेहरा बनला आहे.

निशान वेलूपिल्लई हा काही पहिला भारतीय वंशाचा खेळाडू नाही. याआधी बरोबर २० वर्षापूर्वी, २००६ च्या जर्मन फुटबॉल विश्वचषकात फ्रांसच्या संघातून 'विकाश धोरासू' या खेळाडूने भारताचे नाव उंचावले होते. मूळचे विशाखापट्टणमचे असलेले विकाश जेव्हा झिनेदिन झिदान, थिएरी हेन्री आणि लिलीयन थुराम यांसारख्या दिग्गज खेळाडूंसोबत मैदानात उतरले होते, तेव्हा त्यांनी भारतीय चाहत्यांना भुरळ घातली होती. विकाश धोरासू असो किंवा आजचा निशान वेलूपिल्लई, या खेळाडूंनी हे सिद्ध केले आहे की भारतीय मूळ असलेल्या खेळाडूंमध्ये जागतिक दर्जाची क्षमता आहे. क्रिकेटच्या अफाट वेडात आपण अनेकदा फुटबॉलसारख्या लोकप्रिय खेळाकडे दुर्लक्ष करतो, परंतु जेव्हा एखादा 'भारतीय' फुटबॉलच्या या महाकुंभात चमकतो, तेव्हा संपूर्ण भारतीयांची मान अभिमानाने उंचावते. या घटनेमुळे भारतीय फुटबॉल संघ कधी विश्वचषकाच्या रिंगणात उतरणार, हा प्रश्न पुन्हा एकदा फुटबॉल प्रेमींच्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे.

# दुसऱ्या वनडेत अशी असणार टीम इंडियाची टीम इंडिया

मुंबई-भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील दुसरा वनडे सामना १७ जून (बुधवार) रोजी लखनऊच्या भारतरत्न श्री अटल बिहारी वाजपेयी इकाना क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. ३ सामन्यांच्या या मालिकेत टीम इंडिया सध्या १-० ने पुढे आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा नजर मालिका जिंकण्यावर असेलच, पण सोबतच टीम मॅनेजमेंट पुढील वर्षी होणाऱ्या वर्ल्ड कपचा विचार करून बेंचवर बसलेल्या खेळाडूंना आजमावून पाहू इच्छिते आहेत. धर्मशाळेत झालेल्या पहिल्या वनडे सामन्यात फिरकीपटू हर्ष दुबे आणि वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रार यांना पदार्पणाची संधी मिळाली होती आणि दोघांनीही आपल्या कामगिरीने प्रभावित केले. हर्ष आणि गुरनूर या दोघांनीही प्रत्येकी ३-३ विकेट्स घेतल्या होत्या.

रोहित शर्माच्या दुखापतीमुळे यशस्वी जैस्वालची एन्ट्री?पहिल्या सामन्यात फलंदाजी करताना माजी कर्णधार रोहित शर्माच्या मनगटाला चेंडू लागला होता.




मैदानावर उपचार घेतल्यानंतर रोहितने फलंदाजी सुरू ठेवली, पण तो धावबाद झाला. धावा करताना रोहित काहीसा अडचणीत दिसत होता. ३९ वर्षीय रोहितच्या दुखापतीचे गांभीर्य लक्षात घेता, मॅनेजमेंट त्याला विश्रांती देण्याचा विचार करू शकते. रोहितला विश्रांती दिल्यास फॉर्मात असलेल्या तरुण यशस्वी जैस्वालला प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळेल. जैस्वालने यापूर्वी जेव्हा-जेव्हा दुखापतग्रस्त खेळाडूची जागा घेतली आहे, तेव्हा त्याने दमदार कामगिरी केली असून, गेल्या अशाच एका सामन्यात त्याने नाबाद शतकही ठोकले होते.

कुलदीप यादव की हर्ष दुबे?

पहिल्या वनडेत चायनामन फिरकीपटू कुलदीप यादवला बाहेर ठेवून डावखुरा फिरकीपटू हर्ष दुबेला पदार्पणाची संधी देण्यात आली होती. हर्षने ५ ओव्हरमध्ये ३ विकेट्स घेत सर्वांना प्रभावित केले. दिल्ली कॅपिटल्सकडून खेळताना आयपीएल २०२६ मधील सुमार कामगिरी आणि मुल्लानपूर येथील कसोटीत लय सापडण्यात आ-लेले अपयश यामुळे कुलदीपच्या फॉर्मात घसरण झाली आहे. मात्र, वनडे फॉरमॅटमधील त्याचा अनुभव पाहता, मधल्या ओव्हर्समध्ये तो अजूनही भारताचा हुकमी एक्का ठरू शकतो.प्रिंस यादव करणार पदार्पण?

पहिल्या सामन्यात वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रारने पदार्पण करत सपाट पट्टीवर ३ गडी बाद केले होते. आता भारतीय संघात प्रिंस यादव हा एकमेव असा खेळाडू आहे ज्याने आंतरराष्ट्रीय पदार्पण केलेले नाही. आयपीएल २०२६ मध्ये प्रिंसने लखनऊ सुपर जायंट्ससाठी जबरदस्त कामगिरी केली होती आणि त्याला या मैदानाचा चांगला अनुभव आहे. जर प्रिंस यादवला प्लेइंग इलेव्हनमध्ये घ्यायचे असेल, तर पहिल्या सामन्यात एकही विकेट न मिळू शकलेल्या प्रसिद्ध कृष्णाला बाहेर बसावे लागू शकते.

दुसऱ्या वनडेसाठी भारताची संभाव्य 'प्लेइंग इलेव्हन' : शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, श्रेयस अय्यर, इशान किशन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, नितीश कुमार रेड्डी, हर्ष दुबे, गुरनूर ब्रार, अर्शदीप सिंग, प्रसिद्ध कृष्णा प्रिंस यादव.

## लातूर जिल्ह्यात ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. लातूर जिल्ह्यातील रेणापूर आणि जळकोट तालुक्यांमध्ये प्रत्येकी मुलांचे एक व मुलींचे एक अशी एकूण चार शासकीय वसतिगृहे कार्यरत असून या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवर्गनिहाय अर्ज करावे लागणार आहेत.

या प्रवेश प्रक्रियेत ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी ९० टक्के, ऊसतोड कामगारांचे पाल्य असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के, ऊसतोड कामगार असलेल्या विधवा, परित्यक्ता व एकल पालक यांच्या पाल्यांकरिता ३ टक्के, तर ज्यांचे मृत्यू झालेले पालक ऊसतोड कामगार होते अशा अनाथ पाल्यांसाठी २ टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांनी ३० जून २०२६ पर्यंत अर्ज करणे आवश्यक असून त्यांची प्रवेश प्रक्रिया ७ जुलै २०२६ रोजी अंतिम केली जाईल, तर इयत्ता ११ वी, १२ वी आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी १५ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करावयाचे असून त्यांची प्रवेश प्रक्रिया ३१ जुलै २०२६ रोजी अंतिम करण्यात येणार आहे.

या वसतिगृहांमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत शैक्षणिक साहित्य, स्टेशनरी, एका वेळेचा सकस नाश्ता आणि दोन वेळचे चविष्ट भोजन यासह विविध शैक्षणिक सोयी-सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे जिल्ह्यातील अधिकाधिक ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी त्वरित अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा. प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी संबंधित वसतिगृहांचे गृहपाल तसेच सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

# शाळेच्या पहिल्याच दिवशी 'रीड लातूर' कडून चिमुरड्यांना पुस्तकांची अनोखी भेट!

* लातूर तालुक्यातील खंडाळा, नीलकंठ, सारसा, भिसेवाघोली आणि वाडीवघोली शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

* दीपशिखाताई धिरज देशमुख आणि धिरज विलासराव देशमुख यांचा स्तुत्य उपक्रम








**लातूर/प्रतिनिधी:** उन्हाळ्याची मोठी सुट्टी संपल्यानंतर शाळांची घंटा पुन्हा वाजली. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन केले जाते, यासोबतच लातूर ग्रामीण मधील विद्यार्थ्यांना पुस्तकाची भेट मिळाली. 'रीड लातूर' उपक्रमांतर्गत पहिल्याच दिवशी शाळांमध्ये रंगीबेरंगी गोष्टींच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आल्याने चिमुरड्यांचे चेहरे आनंदाने खुलून गेले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि मनोरंजक पुस्तके वाचायला मिळावीत, जेणेकरून त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी दीपशिखा ताई धिरज देशमुख आणि धिरज विलासराव देशमुख हे नेहमीच आग्रही आणि प्रयत्नशील असतात. त्यांच्या याच संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी लातूर तालुक्यातील खंडाळा, नीलकंठ, गणेशनाथ, भिसेवाघोली आणि वाडीवघोली या शाळांमधील विद्यार्थ्यांना 'रीड लातूर'ची खास पुस्तके वाचनासाठी भेट देण्यात आली असल्याची माहिती रीड लातूर उपक्रमाचे समन्वयक राजू सी पाटील यांनी दिली आहे.

**पुस्तकातील चित्रे आणि गोष्टी ठरल्या आकर्षणाचे केंद्र.**

नेहमीच्या जड अभ्यासाच्या पाठ्यपुस्तकांऐवजी पहिल्याच दिवशी हातामध्ये आकर्षक मुखपृष्ठ, सुंदर चित्रे आणि रंजक गोष्टी असलेली पुस्तके मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांनी वर्गात बसून अत्यंत आवडीने वाचन केले. ही पुस्तके मुलांना प्रचंड आवडली असून, त्यातील चित्रे आणि छोट्या-छोट्या गोष्टी ते एकमेकांना दाखवत आनंद घेत होते.

**शिक्षकांकडून व पालकांकडून कौतुक**

डिजिटल युगात मुलांमधील वाचनाची संस्कृती टिकून राहावी आणि ग्रामीण भागातील मुलांचा पाया मजबूत व्हावा, यासाठी 'रीड लातूर'चा हा उपक्रम मैलाचा दगड ठरत आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांमध्ये वाचनाचा उत्साह निर्माण केल्याबद्दल संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ आणि पालकांनी दीपशिखाताई धिरज देशमुख व धिरज विलासराव देशमुख यांचे मनापासून आभार मानले आहेत.

# दृष्टी शिवाय सृष्टीचा मनमुराद आनंद घेणारी दिव्यदृष्टी सहल मोठ्या उत्साहात संपन्न

## महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यातील ७० दृष्टि दिव्यांगाचा सहभाग

**लातूर/प्रतिनिधी:** बीयाँड व्हीजन फाउंडेशन, लातूर, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर (प्रादेशिक उपाध्यक्षा भाजपा, महाराष्ट्र), अॅड. धनंजय चिताडे परिवार, मित्र मंडळ, अॅड. विक्रमजी पाटील चाकूरकर, लातूर शहरातील दानशूर व्यक्ती व संस्था यांच्या सक्रीय मार्गदर्शन आणि आर्थिक सहकार्यातून महाराष्ट्र राज्यातील १५ जिल्ह्यातील अत्यल्प उत्पन्न गटातील ७० दृष्टि दिव्यांग व्यक्तींसाठी ओमकारेश्वर, उज्जैन, सिहोर, चित्रकूट, अयोध्या, काशी, प्रयागराज, माहूर व माळेगाव येथील देव/देवतांच्या दर्शणार्थ ९ दिवसीय लातूर/अयोध्या/लातूर दिव्यदृष्टी सहलीचे आयोजन दि. २७ मे ते ०४ जून २०२६ या कालावधीत करण्यात आले होते.

या सहलीचा उद्घाटन समारंभ दि. २७ मे २०२६ रोजी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, (प्रादेशिक उपाध्यक्षा, भाजपा, महाराष्ट्र), रोटरी डीस्ट्रीक्ट ३१३२चे प्रांतपाल सुधीर लातूरे, लक्ष्मीरमण लाहोटी (अध्यक्ष, दयानंद शिक्षण संस्था, लातूर), लक्ष्मीकांत कर्वा (राजस्थानी शिक्षण संस्था, लातूर), श्रीमती गंगाबाई व्यंकटराव चिताडे, विक्रमजी पाटील चाकूरकर, सुनीलजी ओझा, राजेश मीत्तल, डॉ. शांतीलाल शर्मा यांच्या प्रमुख उपस्थीतीत हॉटेल पार्थ, अंबाजोगाई रोड, लातूर येथे सकाळी बारा वाजता संपन्न झाला.

दि. २७ मे रोजी लातूरहून निघालेल्या या सहलीतील सर्व दिव्यांग दर्शणार्थ्यांनी २८ मे २०२६ रोजी मामलेश्वर व त्यानंतर नर्मदा नदीचा घाट पार करून श्री. ओमकारेश्वर भगवानाचे, दि. २९ मे २०२६ रोजी उज्जैन येथे पहील्यांदा काल भैरव व त्यानंतर श्री. महाकालेश्वर भगवानाचे, त्याच दिवशी संध्याकाळी सिहोर येथे कुब्रेश्वर धाम येथे श्री कुब्रेश्वर भगवानाचे, दि. ३० मे २०२६ रोजी चीत्रकूट येथे मंदाकीनी नदीचे विविध घाट, राम-भरत भेट, हनुमान धारा आदि मंदीरांना भेट देऊन तेथील देव देवतांचे दर्शन, दि. ३१ मे २०२६ रोजी अयोध्या येथे श्रीराम जन्मभूमी येथील मंदिरात श्री. राम लल्लांचे दर्शन, हनुमान गडी दर्शन, दशरथ महल दर्शन, संध्याकाळी सात वाजता शरयू आरती, दि. १ जून २०२६ रोजी काशी विश्वनाथ भगवानाचे दर्शन, संध्याकाळी सात वाजताची गंगा आरती, दि. ०२ जून २०२६ रोजी पर्याग राज येथे जाऊन त्रिवेणी संगमावर गंगास्नान, दि. ३ जून २०२६ रोजी नागपूर वानाडोंगरी नागलवाडी स्थित श्री. गजानन महाराजाचे, दि. ०४ जून २०२६ रोजी माहूरगड येथे अनुसया माता, रेणुका माता, श्री. दत्तात्रय व शेवटी माळेगाव येथे श्री. खंडोबाचे दर्शन मोठ्या उत्साहाने व भक्ती भावाने घेतले.

या सर्व देवस्थानी दर्शन घेताना दृष्टी दिव्यांग दर्शणार्थ्यांच्या चेहऱ्यावर प्रचंड आनंद होता. अयोध्या, उज्जैन, काशी, ओंकारेश्वर येथील मंदिर प्रशासनाने दृष्टी दिव्यांग व्यक्तींच्या विशेष गरजा ओळखून त्यांना सुगम्य स्वरूपातील दर्शन घेण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न उल्लेखनीय ठरले.या प्रवासात विविध मंदिरात आलेले सुखद अनुभव दृष्टी दिव्यांग दर्शनार्थी कधीही विसरू शकणार नाहीत या सुखद अनुभवामध्ये श्रीराम प्रभूंच्या मंदिरात प्रवेश करताना सर्व दिव्यांग दर्शनार्थ्यांमध्ये श्रीराम लल्लांच्या दर्शनाविषयी असलेली प्रचंड उत्सुकता, तेवढीच उत्साही व जिज्ञासू वृत्ती, मंदीर प्रशासनाकडून सर्व दर्शनार्थ्यांस विशेष अतिथी कोट्यातून, सामान्य रांग थांबवून, दिव्यांग दर्शणार्थ्यांची विशेष रांग तयार करून विशेष दर्शन घेण्याची, उपलब्ध करून दिलेली संधी, सर्व दिव्यांग दर्शणार्थ्यांनी मंदिरात घालवलेले तीन तास, श्रीराम लल्लांचे दर्शन घेऊन अत्यंत प्रसन्न मुद्रेने मंदिरा बाहेर पडणारे हे सर्व दिव्यांग दर्शनार्थी या बाबी अत्यंत संस्मरणीय ठरल्या.

हा अनुभव त्यांच्या जिवनातील संस्मरणीय अनुभव ठरला. या अनूभूती ते कधीही विसरणार नाहीत एवढ्या या अनुभूती अमित होत्या.

दृष्टी शिवाय सृष्टीचा आनंद घेण्याची ही धडपड अयोध्या येथे आजतक व काही स्थानिक दूरदर्शन चॅनलनी त्यांच्या कॅमेऱ्यात टिपली. त्यांनी या सहलीत सहभागी दिव्यांग दर्शणार्थ्यांशी संवाद साधून त्यांचे मनोगतही जाणून घेतले. अयोध्या येथील श्रीराम प्रभूंच्या मंदिरासमोरील हे दृश्य खरोखरच खूप अलौकीक होते. दृष्टिशिवाय सृष्टिचा आनंद घेण्याचा हा प्रयत्न अत्यंत प्रशंसनीय असल्याचे दिसून आले.

अयोध्या येथील श्रीराम प्रभूंचे दर्शन व शरयू आरतीचा आनंद घेऊन दर्शन आर्थी सद्गदित झाल्याचे दिसून आले. त्यापैकी काहीजण म्हणाले की, आम्ही कीत्येक दिवसांपासून श्रीराम प्रभूंच्या दर्शनासाठी अतुर होतो व तसेच शरयू आरतीबद्दल खूप ऐकले होते. आज आम्ही या शरयू आरती मध्ये सहभागी होऊन आमचे भाग्य उचळले आहे. आम्ही कल्पनाही करू शकत नाही की, आम्ही आज श्रीराम प्रभूंचे दर्शन घेतले आहे तसेच या शरयू आरती मध्ये सहभागी होऊ शकलो आहोत. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक भवन साकेत नीलयम अयोध्या, या राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत महत्त्वपूर्ण व प्रशस्त, पवित्र स्थळी निवासाची मिळालेली संधी ही बाबसुद्धा या प्रवासातील अत्यंत उल्लेखनीय अनुभूती ठरली.आम्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील काही पदाधिकार्यांशी संवाद साधू शकलो. संघाच्या कार्याविषयी अधिक जाणून घेऊ शकलो. अशी काही दर्शनार्थ्यांनी आपली उत्स्फूर्त भावना व्यक्त केली.त्याचबरोबर ओमकारेश्वर, उज्जैन येथील कालभैरव व श्री. महाकाल तसेच श्री. काशी विश्वनाथ येथील मंदीर प्रशासनाने या सर्व दिव्यांग दर्शणार्थ्यांना विशेष दर्शन मिळावे म्हणून केलेली धडपड प्रत्येकाच्या मनात घर करून राहिली. त्यामध्ये श्री काशी विश्वनाथ मंदिरात सर्व दर्शणार्थ्यांस मंदीराच्या गाभार्यासमोर बसवून त्यांना रात्रीच्या काशी विश्वनाथ आर्तीचा आनंद घेण्याची संधी उपलबध् करून दिली. प्रत्येकांस प्रसन्न वाटत होते. प्रत्येकाच्या मनात प्रचंड उत्साह होता. सर्व जण देवाच्या उत्घोषात मग्न होते.




श्री. काल भैरव मंदीर प्रशासनाने सर्व दिव्यांग दर्शनार्थी यांना सामान्य भक्तांची रांग थोपवूनव गाभाऱ्यापर्यंत नेऊन मूर्तीसमोर थांबवून विशेष दर्शन घेण्याची संधी उपलब्ध करून दिली आणि मोठ्या आस्थेने प्रसादही दिला.

उज्जैन येथील श्री. महाकालेश्वर मंदीर प्रशासनातील कर्मचारी व सुरक्षा रक्षकांनी मोठ्या उत्साहाने व उत्सूकतेने सर्व दिव्यांग दर्शणार्थ्यांस सुलभपणे गाभाऱ्यापर्यंत पोहोचवून अत्यंत निवांतपणे दर्शन घेण्यासाठी केलेले विशेष सहकार्य ही बाबही अत्यंत उल्लेखनीय ठरली. दर्शनानंतर मंदीर प्रशासनाने सर्व दिव्यांग दर्शनार्थ्यांस गाभाऱ्या शेजारी एकत्रीत बसवून त्यांच्या प्राातीनीधीक स्वरूपात मुलाखती आणि छायाचीत्रीकरण केले आणि महाप्रसाद ग्रहण करण्याची केलेली विनंती विशेष आपलेपणा दर्शविणारी ठरली. या प्रवासात सर्व दिव्यांग बंधू-भगिनींना ओमकारेश्वर येथे नर्मदा, चित्रकूट येथे मंदाकिनी व काशी येथे गंगा नदीतून बोटीतून प्रवास करण्याची मिळालेली संधी त्यांच्या जीवनात आगळा वेगळा आनंद देणारी ठरली असे प्रसंग त्यांच्या जीवनात दुर्मिळ मानले जातात. बोटिंग करताना प्रत्येकांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखा होता.

या प्रवासादरम्यान दि. २८ मे रोजी पुणे येथील दृष्टी दिव्यांग दांपत्ये दशरथ व जयश्री शिंदे यांच्या लग्नाचा वाढदिवस, बीयाँड व्हीजन फाउंडेशन, लातूरचे सचीव संदिप चोपडे व कोषाध्यक्षा मीरा चोपडे यांच्या लग्नाचा वाढदिवस, तसेच दि. ०२ जून रोजी स्वयंसेवकांपैकी नागनाथ मेकले यांचा वाढदिवस सर्वांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ही बाब परस्परांविषयी आपुलकी वाढविणारी व सामाजिक सौहार्द संवर्धित करणारी ठरली.दि. ०३ जून रोजी नागपूर येथील वाना डोंगरी नागलवाडी स्थित ज्ञानज्योती अंध विद्यालयास देण्यात आलेली भेट व माहूरगड येथील जिल्हा परीषद शाळा, माहूर येथील मुख्याध्यापक एस. एस. पाटील यांच्या समन्वयातून डॉ. माधव गोरे व श्री राजेश ठाकरे यांनी केलेल्या प्रयत्नातून राष्ट्रसंत श्री साईनाथ महाराज वसमतकर यांच्या आनंद दत्तधाम आश्रमात राष्ट्रसंत श्री साईनाथ महाराज वसमतकर यांच्या समक्ष व आश्रमात उपस्थित मोठ्या प्रमाणातील श्रोत्यांसमोर संगीत क्षेत्रात दिग्गज असलेल्या राजेश ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली प्रा. कृष्णा शिंगारे, श्रावणी अडसुळे व त्यांना वादकाच्या भूमिकेत साथ देणारे संदीप चोपडे, बालाजी गुट्टे, आकाश झुलवाड, हनुमान गीते, मिरा चोपडे यांच्या सहकार्यातून मंत्रमुग्ध करून टाकणारे भक्ती गीत गायन सादर करण्याची मिळालेली संधी स्मरणार्थ राहणारी ठरली.

यावेळी सहलीचे मुख्य समन्व्यक डॉ. माधव गोरे, विशेष शिक्षक राजेश ठाकरे, स्वयंसेवकांपैकी नागनाथ मेकले इतरांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी राजेश ठाकरे यांनी मंत्र मुग्ध् करून टाकणारे गायन केले. त्यांना प्रा. कृष्णा सिंगारे व श्रावणी अडसुळे यांनी तेवढीच मोलाची साथ दिली.

या अत्यंत पवित्र स्थळी भोजन व निवासाची संधी व भजन सेवेची मिळालेली संधी या बाबी या दिग्गज संगीत कलाकारांसाठी व सहलीतील दृष्टी दिव्यांग बंधू-भगिनींसाठी मोठ्या प्रमाणात सन्मानित करणाऱ्या ठरल्या.दि. ०४ जून २०२६ रोजी दुपारी तीन वाजता श्री खंडोबाचे दर्शन घेऊन सदर सहलीचा समारोप करण्यात आला.चाकूर येथे रोटरी क्लब ऑफ चाकूरचे अध्यक्ष डॉ. केदार पाटील व त्यांच्या मित्रमंडळाने सहलीतील सर्व दिव्यांग बंधू/भगिनींचे सहल सांगता प्रसंगी केलेले अभिनंदन ही बाब सदर दृष्टी दिव्यांग बंधू-भगिनी कधीही विसरणार नाहीत.

या सहलीच्या यशस्वीतेसाठी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, बीयाँड व्हीजन फाउंडेशन, लातूरचे अध्यक्ष डॉ. माधव गोरे, सचीव संदीप चोपडे, कोषाध्यक्षा मीरा चोपडे, अॅड. धनंजय चिताडे, अॅड. विक्रमजी पाटील चाकूरकर, सुनीलजी ओझा, प्रविण मीटकरी, किशोर ससाने, शहरातील दानशूर व्यक्ती व संस्था यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

तसेच स्वयंसेवकाच्या रूपात सहाय्य करणारे पानगाव येथील माजी सरपंच सुकेश भंडारे, जिल्हा परिषद सहशिक्षक नागनाथ मेकले, सुदर्शन पाटील, प्रा. राजकुमार मुसने, सॉफ्टवेअर इंजिनियर कु. प्रतीक्षा गोरे, सुजाता गोरे, अमोल येर्वे, अमोल भंडारे, रुखमे दादा, गणेश माने, गणेश पवार यांनी विशेष परीश्रम घेतले.

# अनुसूचित जातीतील उपवर्गीकरणासाठी पुणे-मुंबई लॉन्ग मार्च; २४ जून रोजी आझाद मैदानावर मोर्चाचे आयोजन




**लातूर/प्रतिनिधी:** अनुसूचित जातीतील उपेक्षित व वंचित घटकांना न्याय मिळावा तसेच सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निकालानुसार अनुसूचित जातीमध्ये उपवर्गीकरण लागू करण्यात यावे आणि सामाजिक न्याय व सलोखा कायम राखावा, या प्रमुख मागण्यांसाठी अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या वतीने पुणे ते मुंबई असा लॉन्ग मार्च आयोजित करण्यात आला आहे. ही माहिती संघटनेच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

पुणे येथील आद्य क्रांतिगुरू देशपिता लहुजी बाबा साळवे यांच्या समाधीस्थळापासून १७ जून रोजी या लॉन्ग मार्चला प्रारंभ होणार असून २४ जून रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे भव्य मोर्चा व आंदोलनाने त्याची सांगता होणार आहे.

या आंदोलनाला होल्हार, बुरूड, मेहतर, भंगी, हिंदू खाटीक, कैकाडी, चांभार, ढोर, मोची आदी उपेक्षित जातींसह विविध सामाजिक संघटना व संघटनांचा पाठिंबा मिळत असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या सुनबाई सावित्रीमाई साठे, नातू सचिनभाऊ साठे, गणेशभाऊ भगत, अण्णाभाऊ साठे यांचे नाती व नातजावई, ड. टी. एन. कांबळे आणि राज क्षीरसागर हे करणार आहेत. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधून संघटनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी राज क्षीरसागर यांनी लातूर जिल्ह्यातील कार्यकर्ते, समाजबांधव आणि नागरिकांनी २४ जून रोजी मुंबईच्या आझाद मैदान येथे हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला बळ द्यावे, असे आवाहन केले. पत्रकार परिषदेला राज क्षीरसागर, ड. टी. एन. कांबळे, सुरेश चव्हाण, आनंद वैरागे, डी. एल. वाघमारे, सचिंद्र कांबळे, किशोर शिंदे, पिराजी साठे, अशोक गायकवाड, नेताजी मस्के, राहुल क्षीरसागर, विजय गव्हणे, राहुल घोलप, अर्जुन बावरी, नारायण जोगदंड, सुनील जोगदंड, आकाश लोंढे, सूरज लोंढे, श्रीधर आवळे, मुकेशबली क्षीरसागर, अतिश पाटोळे, सचिन कांबळे, अनिकेत गायकवाड, अजय गोटमुखले, बली कांबळे, भुजंग अर्जुने, आकाश शिंदे, दत्ता साळुंखे, मनीष हजारे, लहुजी शिंदे, नेताजी कांबळे, मुकेश पवार, अविनाश कांबळे, रितेश कांबळे, करण कदम, मंगेश जोगदंड, विशाल पवार, रघु काळे, विशाल काळे, ईश्वर काळे, मंगेश तुरे आदी उपस्थित होते.



# ‘नीट-युजी २०२६’ परीक्षा तयारीचा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्याकडून आढावा

**लातूर/ प्रतिनिधी:** येत्या २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या ‘नीट-युजी २०२६’ या परीक्षेच्या अनुषंगाने लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्याया बैठकीत परीक्षेच्या नियोजनबद्ध आणि पारदर्शक आयोजनासाठी संबंधित विभागांना सविस्तर सूचना देण्यात आल्या.

उपजिल्हाधिरकारी सायली ठाकूर, जिल्हा संपर्क अधिकारी डॉ. महेंद्र गायकवाड आणि महेश सूर्यवंशी यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.




लातूर जिल्ह्यात एकूण २६ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात येणार आहे. यामध्ये लातूर येथील १९, अहमदपूर येथील २, उदगीर येथील २, निलंगा येथील २ आणि चाकूर तालुक्यातील चापोली येथील एका परीक्षा केंद्राचा समावेश आहे. या सर्व केंद्रांवर परीक्षा सुरळीत पार पडावी आणि कोणताही गैरप्रकार होऊ नये, यावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी ‘ड्युटी मॅजिस्ट्रेट’ आणि ‘स्टेट ऑब्झर्वर’ यांची विशेष नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

**विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी नियंत्रण कक्ष**

परीक्षेच्या दिवशी, म्हणजेच २१ जून २०२६ रोजी विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची तांत्रिक किंवा इतर कोणतीही अडचण आल्यास, तिचे तत्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२२०२०४ असा असून, विद्यार्थी व पालकांना गरजेच्या वेळी यावर संपर्क साधता येईल. तसेच परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि कोणत्याही आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीचा सामना करण्यासाठी विशेष वैद्यकीय पथके नियुक्ती करण्यात येणार आहेत.

# विधान परिषद निवडणुकीनिमित्त लातूर जिल्ह्यात दोन दिवस मद्यविक्री बंद

**लातूर/ प्रतिनिधी:** उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यात दोन दिवस मद्यविक्री बंद राहील. निवडणूक खुल्या, मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी मद्य विक्री बंदीचे सुधारित आदेश जारी केले आहेत. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील कलम १३५ (सी) आणि महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४२ (१) अन्वये देण्यात आलेल्या या सुधारित आदेशानुसार, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी म्हणजेच गुरुवार, १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत आणि मतमोजणीच्या दिवशी, सोमवार, २२ जून २०२६ रोजी मतमोजणीच्या ठिकाणी प्रक्रिया पूर्ण संपेपर्यंत मद्य विक्री पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

हा आदेश लातूर जिल्ह्यातील प्रत्यक्ष मतदान व मतमोजणी होत असलेल्या सर्व संबंधित क्षेत्रांना लागू राहणार आहे. यामध्ये लातूर महानगरपालिका हद्दीसह रेणापूर, अहमदपूर, जळकोट, चाकूर, उदगीर, शिरूर अनंतपाळ, देवणी, औसा आणि निलंगा या सर्व नगर पंचायत हद्दींचा समावेश आहे. या सर्व नमूद क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या सर्व देशी आणि विदेशी मद्याची घाऊक व किरकोळ विक्री, तसेच ताडी विक्री अनुज्ञप्ती (नमुना एफएल-१, एफएल-२, एफएल-३, एफएल-४ क्लब अनुज्ञप्ती, सीएल-२, सीएल-३, टिओडी-३, टिडी-१ इत्यादी सर्व प्रकारची दुकाने) या आदेशित कालावधीत पूर्णपणे बंद राहतील.

सर्व संबंधित मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांनी या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. या आदेशाचे पालन करण्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ५४ व ५६ मधील तरतुदीनुसार संबंधितांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# लातूर जिल्ह्यातील ‘नीट’ परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर/ प्रतिनिधी:** राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत रविवार, २१ जून २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील एकूण २६ उपकेंद्रांवर ’नीट युजी’ परीक्षा पार पडणार आहे. ही परीक्षा पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये सर्व परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. परीक्षेच्या दिवशी प्रश्नपत्रिकांची बेकायदेशीर छपाई किंवा इतर गैरप्रकार टाळण्याच्या उद्देशाने परीक्षा केंद्राच्या १०० किंवा आवश्यकतेनुसार २०० मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर्स, दुकाने, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बुथ आणि ध्वनिक्षेपक परीक्षा सुरू होण्यापूर्वी एक तास अगोदरपासून ते परीक्षा संपेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्देश या आदेशात देण्यात आले आहेत. तसेच, परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी वगळता पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास आणि शांतता भंग होईल असे कृत्य करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीला किंवा वाहनाला प्रवेश दिला जाणार नाही. याव्यतिरिक्त, परीक्षा केंद्राच्या आवारात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे सोबत बाळगून प्रवेश करण्यासही मनाई करण्यात आली आहे. प्रतिबंधात्मक आदेश हे परीक्षेच्या कामकाजासाठी व निगराणीसाठी नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस यांना त्यांच्या कर्तव्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत. मात्र, ही परीक्षा अत्यंत सुरळीत आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील इतर सर्व नागरिकांनी या प्रतिबंधात्मक आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# योग, आरोग्य आणि ऊर्जा यांचा संगम; महापारेषणमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनाचा उत्साह

## पद्मश्री उदय देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली मल्लखांब प्रात्यक्षिक; राज्यभरातील अधिकारी-कर्मचारी ऑनलाइन सहभागी होणार

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) वतीने यंदाचा आंतरराष्ट्रीय योग दिन आरोग्य, ऊर्जा आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या शारीरिक व मानसिक आरोग्य संवर्धनासाठी महापारेषणने विशेष आरोग्य अभियान हाती घेतले असून, त्यामध्ये योग, प्राणायाम, ध्यान, आयुर्वेद, मल्लखांब आणि निसर्गोपचाराचा सुरेख संगम पाहायला मिळणार आहे.

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली तसेच अपर जिल्हाधिकारी व कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली १६ ते १९ जून या कालावधीत विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी (दि.१६) झालेल्या आरोग्य शिबिरात तब्बल ६० अधिकाऱ्यांनी लाभ घेतला. यामध्ये नाडी परीक्षण, आयुर्वेदिक व हर्बल चिकित्सा, ॲक्युप्रेशर, ॲक्युपंक्चर, न्यूरल हीलिंग, ध्यान आणि त्वचा आरोग्यविषयक मार्गदर्शनाचा समावेश आहे. या उपक्रमांना अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

आंतरराष्ट्रीय योग दिन




योग दिनाचा मुख्य कार्यक्रम रविवार, २१ जून रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत वांद्रे (पूर्व) येथील प्रकाशगंगा इमारतीतील सांघिक कार्यालयात होणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे पद्मश्री उदय देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणारे मल्लखांब प्रात्यक्षिक. तसेच योगगुरू राधेश्याम जैस्वर, शिवानंद महाराज आणि डॉ. संतोष पांडे उपस्थितांना योगसाधना, प्राणायाम आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व पटवून देणार आहेत.

या कार्यक्रमाला महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) दत्तात्रय पडळकर, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्यासह भारतीय एकता मंचाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रेम विश्वकर्मा, सुप्रसिद्ध गायक रूपकुमार राठोड आणि चित्रपट दिग्दर्शक टीनू वर्मा उपस्थित राहणार आहेत. योग सत्रानंतर सहभागींसाठी सात्त्विक व पौष्टिक अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण महापारेषणच्या सोशल मीडिया माध्यमांवरून करण्यात येणार असून राज्यभरातील अधिकारी आणि कर्मचारी ऑनलाइन सहभागी होणार आहेत. यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळेवर उपस्थित रहावे. तसेच महावितरण आणि महानिर्मितीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड आणि मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांनी केले आहे.

आरोग्यदायी जीवनशैली, मानसिक संतुलन आणि कार्यक्षमतेत वाढ घडवून आणण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम महापारेषणच्या कर्मचारी कल्याणाच्या बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरणार आहे.

# विश्वेश्वरय्याचे उपप्राचार्य गोपाळ दंडिमे यांना पिएच.डी. प्रदान

**औसा/प्रतिनिधी:** तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित विश्वेश्वरय्या इंन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन विभागाचे विभागप्रमुख प्रा. गोपाळ दंडिमे यांना परफॉर्मन्स इम्प्रुव्हमेंन्ट ऑफ सोलार एनर्जी हार्वेस्टिंग सिस्टीम युझींग पीआयडी कन्ट्रोलर विद वायरलेस सेन्सॉर नेटवर्क (Performance



Improvement of Solar Energy Harvesting System using PID Controller with wireless Sensor Network) या विषयामध्ये सादर केलेल्या प्रबंधास ओरिएन्टल युनिव्हर्सिटी, इंदोर येथुन प्रो. डॉ. मनिष सावळे यांच्या मार्गदर्शनाखाली इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन विभागाअंतर्गत सदरील विषयात पिएच. डी. प्रदान करण्यात आली. आज समाजात सदरील विषयामुळे सद्या व येणाया काळात भेडसावणाया सोलार एनर्जी आणि इंटरनेट ऑन थिंग्ज (IoT) यांच्या संदर्भात येणाया समस्या दुर होण्यास मदत होईल व या क्षेत्रामध्ये करिअर क डिग्री इच्छिणाया संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल. ज्यामुळे एनर्जी संकट दुर होण्यास मदत होईल.

उपप्राचार्य डॉ. गोपाळ दंडिमे यांचा संस्थेच्या वतीने संस्था अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, विश्वेश्वरय्या इंन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, विभागप्रमुख प्रा. रेवणसिध्द बुक्का, प्रा. प्रविण साबदे, प्रा. अंकुश बिडवे, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. संदेश माडे, प्रा. अजित लोकरे, प्रा. अब्दुल समद काझी यांच्या उपस्थितीत अभिनंदन करून सत्कार करण्यात आला. तसेच सर्व युनिटमधील प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यावतीनेही अभिनंदन करण्यात आले.

## टी .सी. हरवली आहे

महेश वसंत ढगे या नावाची अनंत तुळजाराम नाईक विद्यालय, नळेगाव तालुका चाकूर, जिल्हा लातूर, या शाळेची दहावी पासची टीसी हरवली आहे. सदर टी.सी. नळेगाव ते लातूर प्रवास करीत असताना हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास संपर्क सादावा. योग्य बक्षीस दिले जाईल.

संपर्क: मोबाईल :९७३०२८३२६४

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

## सिनियर..

वरिष्ठ नागरिक प्रेम
का दावता ऊठसूठ
एकाहाताने सवलत
दुस-याने करता लूट
पेंशन नवी का जुनी
तिथेमात्रकाथ्याकूट
पाय उतार होताना
डोक्या ठेवता मुकूट
शरीरसाथ नाही देत
प्रवासात देतात सूट
आंदोलन कोण करे
खिळखिळे वज्रमूठ
सूर्यास्ताच्या वेळेला
का बाग दे कुक्कुट
दानशूर सारे एकत्र
छान जमले मेतकूट
तारुण्याच्या उमेदीत
सारे धोरण आडमूठ
कशी पकडावी वाळू
आता सैलपडते मूठ
वासना उडे अन्नाची
उभे स्वादिष्टअन्नकूट
दिखाऊ करे देखावा
किती वागायचे झूठ
वाहून गेले सारे झरे
कशी भरुनकाढे तूट
निखळूनि पडे बंधने
बोले स्नेहधागे अतूट

**- हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

# स्मार्ट मीटर मेळाव्यास वीज ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी:** महावितरणकडून स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या शंका दूर करण्यासाठी व जनजागृतीसाठी उपविभागनिहाय आयोजीत ग्राहक समाधान मेळाव्यास लातूर शहर उपविभागासह जिल्हयातील इतर उपविभागात वीजग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या मेळाव्यास लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी स्वत: हजेरी लावत ग्राहकांच्या शंकांचे निरसन केले.



लातूर विभागातील लातूर शहर उपविभाग, निलंगा विभागातील किल्लारी तसेच उदगीर विभागातील उदगीर शहर व ग्रामीण उपविभाग आणि जळकोट उपविभाग येथे आज (दि.१६) स्मार्ट मीटर जनजागृतीसाठी मेळावा घेण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी स्मार्ट मीटर बाबत तक्रारी जाणून घेत त्यांच्या शंकांचे निरसन केले. त्याचबरोबर काळानुरुप वीजमीटरच्या तंत्रज्ञानात होत गेलेल्या बदलांची माहिती दिली. जुने फिरणारे चकतीच्या मीटर पासून ते इफलेक्ट्रॉनिक मीटर, रेडीओ फ्रीक्वेन्सी मीटर पर्यंतचा होत गेलेला ग्राहकाभिमूख बदलांचा इतिहास सांगत स्मार्ट मीटर अधिक अचूक असून वीजग्राहकांचा जेवढा वीजवापर आहे तेवढाच नोंदवला जातो अशी माहिती दिली. त्याचबरोबर रिडींग मध्ये होणारा मानवी हस्तक्षेप टाळून नेमके वीजवापराचे बील दिले जाते. मीटर मध्ये छेडछाड कय्न होणारी वीजचोरीही तत्काळ सर्व्हरला कळत असल्यामुळे वीजगळतीवरती नियंत्रण ठेवणे शक्य होत असल्याचे सांगत, स्मार्ट मीटर मुळे रियल टाईम वीजवापर कळतो व ग्राहकांना वीजवापरावर नियंत्रण ठेवणे शक्य होते.

दिवसा वीजवापरावर ८० पैसे प्रति युनीट सूट मीळत असल्यामुळे वीग्राहकांचाही यात लाभ होत असल्याचवे श्री बुलबुले म्हणाले. ज्या ग्राहकांना वाढीव वीजबील येत आहे त्यांनी आपल्या घरातील आर्थिंग चेक करावी तसेच आरसीबी लावून घेण्याचाही सल्ला त्यांनी दिला. यावेळी लातूर विभागाचे कार्यकारी अभियंता अनिरुध्द घाटगे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रमोद दुधाळे उपस्थित होते.

**- या ठिकाणी होणार मेळावा -**

लातूर ग्रामीण व रेणापूर उपविभाग, मध्ये बुधवारी (दि.१७ जून), तसेच मुरुड उपविभाग येथे गुरूवारी (दि.१८ जून) , निलंगा विभागांतर्गत बुधवारी (दि.१७ जून) कासारशिरशी उपविभागात तर गुरुवारी (दि.१८ जून) औसा, निलंगा व शिरुर अनंतपाळ उपविभागात त्याचबरोबर उदगीर विभागातील अहमदपूर, शिरुरताजबंद व चाकूर उपविभागात बुधवारी (दि.१७ जून) सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेदरम्यान स्मार्ट मीटर संदर्भात ग्राहक समाधान मेळावा घेण्यात येणार आहे.

महावितरणने सर्व ग्राहकांना संबंधित उपविभाग स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या ग्राहक समाधान मेळाव्यांना उपस्थित राहून स्मार्ट मीटरबाबत प्रत्यक्ष माहिती घेण्याचे आवाहन केले आहे.

# प्रमाणित बियाण्यांसाठी ‘महाडीबीटी’वर अर्ज सुरु

## - महिला शेतकऱ्यांसाठी ३० टक्के आरक्षण; प्रथम येणाऱ्यास प्राधान्य

**लातूर/प्रतिनिधी:** खरीप हंगाम २०२६ मध्ये प्रमाणित बियाणे वितरणासाठी ’महाडीबीटी’वर अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. ’कडधान्य आत्मनिर्भरता अभियाना’अंतर्गत हे अर्ज मागवण्यात आले आहेत. तूर, मूग, उडीद आणि ज्वारीच्या प्रमाणित बियाण्यांचे वाटप केले जाणार आहे. यासाठी वैयक्तिक शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत. या योजनेत अधिसूचित वाणांसाठी अनुदान दिले जाईल. पाच वर्षांच्या आतील वाणासाठी प्रति क्विंटल ६ हजार रुपये अनुदान मिळेल. तर, पाच ते दहा वर्षांच्या आतील वाणासाठी ३ हजार रुपये प्रति क्विंटल अनुदान दिले जाणार आहे. लाभार्थ्यांची निवड ’प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य’ या तत्त्वावर केली जाईल. सन २०२६ हे ’आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष’ आहे. त्यामुळे एकूण लाभार्थ्यांपैकी किमान ३० टक्के आरक्षण महिला शेतकऱ्यांसाठी निश्चित करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी अर्ज करण्यासाठी ’ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी’चा वापर करावा. ’महाडीबीटी’ पोर्टलवर (https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin) जाऊन आपले अर्ज भरावेत. अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या (www.krishi.maharashtra.gov.in) संकेतस्थळाला भेट द्यावी. माहिती हवी असल्यास स्थानिक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक महेशकुमार तीर्थकर यांनी केले आहे.

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
धाउब्लप्लेड ट्रिसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६